रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २५६
www.ramprahar.com

◆ शनिवार, ४ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

बनावट प्रमाणपत्र नोंदणीप्रकरणी आणखी एकाला अटक/३

एका दिवसात तबल १२ कोटी महसूल जमा!/५

राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेत सुखदीपला कांस्यपदक/८

## इंडिया स्किल्स स्पर्धेत महाराष्ट्राची दमदार कामगिरी

**मुंबई :** वर्ल्ड स्किल्स स्पर्धेसाठी रंगीत तालीम मानल्या जाणाऱ्या इंडिया स्किल्स २०२५-२६ स्पर्धेत महाराष्ट्रातील स्पर्धकांनी चार सुवर्ण, आठ रौप्य आणि पाच कांस्य अशी एकूण १७ पदके प्राप्त केली आहेत. उत्तर प्रदेश येथे ग्रेटर नोएडामधील इंडिया एक्स्पो सेंटर अँड मार्ट येथे ही स्पर्धा पार पडली. आगामी २०२७-२०२८ची ही स्पर्धा मुंबईत होण्यासाठी शिफारस करण्यात आली आहे. या यशाबद्दल कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांनी संपूर्ण चमूचे आणि विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. इंडिया स्किल्स स्पर्धेतील या विजयामुळे महाराष्ट्रातील यशस्वी उमेदवारांना आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. चीनमधील शांघाय येथे सप्टेंबर मध्ये होणाऱ्या वर्ल्ड स्किल्स स्पर्धेसाठी आता या विजेत्यांच्या प्रशिक्षणाची पुढील फेरी लवकरच सुरू होणार आहे.

# भाजप स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रम

## राज्यात ५१ लाख घरांवर फडकणार पक्षाचा झेंडा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त ५ ते १२ एप्रिल या काळात राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ६ एप्रिलला ५१ लाख घरांवर भाजपचा झेंडा फडकावला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते, मंत्री या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.



या संदर्भात भाजप प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि.३) भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली. प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. स्थापना दिनानिमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमांध्ये मुख्यमंत्री फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्यासह ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे, सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील तसेच राज्यातील इतर सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी जनतेशी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. या निमिताने राष्ट्रवादी विचारांचा उत्सव साजरा होईल, असेही उपाध्ये यांनी नमूद केले.

यंदा ६ एप्रिल रोजी राज्यातील ५१ लाख घरांवर भाजपचा झेंडा फडकावला जाईल तसेच पक्षाच्या आजवरच्या वाटचालीनिमित्त तयार करण्यात आलेला माहितीपट दाखविण्यात येणार आहे. दोन खासदारांपासून जगातील सर्वात मोठ्या पक्षापर्यंतचा भाजपचा प्रवास यातून उलगडला जाणार आहे. पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील एक हजार २०० मंडळांमध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

याबरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईत, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व अन्य प्रमुख नेते, मंत्री ६ व ७ एप्रिल रोजी पक्ष कार्यकर्ते व जनतेशी संवाद साधतील. सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम होईल. गाव चलो, वस्ती चलो या कार्यक्रमातून पक्षाचे पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते जनसंपर्क अभियान राबविणार आहेत, असे उपाध्ये यांनी सांगितले.

### ६ एप्रिल एक पर्व!

*६ एप्रिल हा भाजपचा स्थापना दिन आहे. यानिमित्ताने २८८ विधानसभा मतदारसंघात, ३६ जिल्ह्यात आणि राज्यातील एक लाख बुथवर स्थापना दिनाचे कार्यक्रम होणार आहेत. प्रत्येक बुथवर वॉल पेंटिंग, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार, सक्रिय कार्यकर्त्यांचे मेळावे, समाजातील नामवंत व्यक्तींशी संपर्क, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांशी संपर्क असे कार्यक्रम होतील.*

# नागोठण्याजवळ बस उलटून दोघांचा मृत्यू, २२ प्रवासी जखमी

**पनवेल, नागोठणे : वार्ताहर, बातमीदार**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी (दि. ३) पहाटे भीषण अपघात झाला. नागोठणेजवळील सुकेळी खिंडीत खासगी लक्झरी बस उलटून दोन जणांचा मृत्यू, तर २२ प्रवासी जखमी झाले आहेत.

ओमकार ट्रॅव्हल्सची खासगी बस (एमपी १३ झेडपी ४५४५) मुंबईहून गोव्याच्या दिशेने निघाली होती. बसमध्ये पनवेलमधील विभुते कुटुंबीय, त्यांचे सहकारी आणि इतर प्रवासी होते. ही बस पहाटे अडीचच्या सुमारास सुकेळी खिंडीत पोहचली असता चालकाचा ताबा सुटला आणि वेगात धावणारी बस काही क्षणांतच उलटली.

या अपघातात पनवेलमधील ओम् सर्व्हिसेसचे मालक वैभव विभुते यांच्या पत्नी नीलम विभुते (वय ४०) तसेच अन्य एक प्रवासी नाईम निजाम शेख (वय ३३, रा. कामोठे, ता. पनवेल) यांचा मृत्यू झाला. त्याचप्रमाणे २२ प्रवासी जखमी झाले आहेत. यातील काहींची प्रकृती गंभीर आहे.

अपघाताची माहिती मिळताच नागोठणे पोलीस, स्थानिक ग्रामस्थ आणि बचाव पथक काही मिनिटांत घटनास्थळी पोहचले. बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी क्रेनची मदत घ्यावी लागली. जखमींना तातडीने नागोठणे येथील शासकीय



रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी कळंबोलीतील एमजीएम रुग्णालय आणि रोहा येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पोलिसांनी बस बाजूला करून वाहतूक सुरळीत केली, मात्र या अपघाताने एका आनंदाच्या सहलीवर निघालेल्या कुटुंबावर काळाने अचानक घाला घातला आणि मागे राहिल्या त्या फक्त वेदनादायी आठवणी. या अपघातप्रकरणी बसचालक हेमंतकुमार बाजीराव पाटील (वय ३६, रा. कालिक्षर नगर, ता. कणकवली, जि.सिंधुदुर्ग) याच्यावर नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# शरीर आणि मन दोन्ही सुदृढ होण्यासाठी खेळाची नितांत गरज -लोकनेते रामशेठ ठाकूर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शरीर आणि मन दोन्ही सुदृढ होण्यासाठी खेळाची नितांत गरज असून कुस्ती हा खेळ या दोन्ही आघाड्यांवर उत्तम काम करतो. त्यामुळे नितळस येथे सुरू झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुल हे तरुणांच्या आरोग्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

### नितळस येथील राष्ट्रीय कुस्ती संकुलाचे उद्घाटन

पनवेल तालुक्यातील नितळस येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने उभारण्यात आलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलाचे उद्घाटन गुरुवारी (दि. २) लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. त्यावेळी ते बोलत होते. त्यांनी यावेळी कुस्ती संकुलासाठी २० लाख रुपयांचा निधी जाहीर करून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. **(पान २ वर..)**

# नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध -आमदार महेश बालदी

## ■ आपटा घेरावाडी येथे बोअरवेल आणि सोलर पंपाचे लोकार्पण

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

दुर्गम भागामध्ये सेवा करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य असून नागरिकांच्या समस्या सोडवणे ही आमच्यासाठी विकासकामांची मोठी संधी आहे. या संधीचे आम्ही निश्चितच सोने करू, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी आपटा घेरावाडी येथे बोअरवेल आणि सोलर पंपाच्या लोकार्पण सोहळ्यावेळी केले.

पनवेल तालुक्यातील आपटा येथील दुर्गम अशा घेरावाडीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नातून तसेच पंचायत समिती सभापती रंजना वास्कर यांच्या पुढाकाराने बोअरवेल आणि सोलर पंप उभारण्यात आला आहे. या विकासकामाचे लोकार्पण सभापती रंजना वास्कर यांच्या हस्ते आणि आमदार महेश बालदी व भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि.२) झाले.

पनवेल पंचायत समितीच्या सेस फंडातून हे काम पूर्ण करण्यात आले असून सभापती



रंजना वास्कर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी बोलताना आमदार महेश बालदी यांनी पुढील १५ ते २० दिवसांमध्ये घेरावाडीतील प्रत्येक घरात पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण केले जाईल, अशी ग्वाही ग्रामस्थांना दिली.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, पं.स. सदस्य मयुर शेलार, माजी सरपंच सदाशिव वास्कर, गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सभापती वास्कर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# 'अवकाळी'मुळे रब्बी पिके धोक्यात!

## शेतकरी हवालदिल

**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या काही भागात सुरू असलेल्या अवकाळी पावसाने आता कोकणातही हजेरी लावली आहे. रायगड जिल्ह्यात गुरुवारी



दुपारी अचानक झालेल्या पावसाने रब्बी हंगामातील पिके धोक्यात आली आहेत.

गेल्या काही दिवसांपासून हवामानात बदल जाणवत होते. वाढलेल्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झालेले असताना गुरुवारी दुपारनंतर पावसाच्या सरी बसरल्या. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली, तर काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. या पावसाचा सर्वाधिक फटका शेतीला बसला. सध्या कडधान्य पिकांची काढणी आणि मळणी सुरू आहे. वाल, मुग, पावटा, चवळी, हरभरा ही पिके शेतात, मळणीत असतानाच पावसाने हजेरी लावल्याने मोठे नुकसान झाले आहे, तर काही शेतांमध्ये कलिंगड पीक खराब होण्याची भीत आहे. आंब्याची मोठ्या प्रमाणात गळती होऊन बागायतदारांचे नुकसान झाले आहे.

पावसामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक नियोजन बिघडले असून नुकसानभरपाईची मागणी जोर धरत असून प्रशासनाकडून तातडीने पंचनामे करून मदत देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस ढगाळ वातावरण राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

# महसूल विभागाचा नवा आकृतीबंध मंजूर

## ३५ हजार ८७६ पदांची भर

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने महसूल विभागाचा नवा आकृतीबंध मंजूर केला असून तब्बल ३५ हजार ८७६ पदांची निर्मिती करण्यात आल्यामुळे प्रशासकीय यंत्रणा अधिक बळकट होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि.३) दिली.

या निर्णयामुळे राज्यात ११ नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये, आठ नवीन उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालये, दोन नवीन तहसीलदार कार्यालये आणि ६९ अप्पर तहसीलदार कार्यालये सुरू होणार आहेत.

# पनवेलमध्ये आज खुशरंग संगीत महोत्सव

## नामवंत कलाकारांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.४) सायंकाळी ५ वाजता पनवेलमध्ये भव्य खुशरंग संगीत महोत्सव होणार आहे. शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात रंगणाऱ्या या महोत्सवात संगीत क्षेत्रातील अनेक नामवंत आणि अनुभवी कलाकार आपली कला सादर करणार आहेत.



या महोत्सवात किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. फिरोज दस्तुर यांचे शिष्य पं. गिरीश संजगिरी, पं. पी.व्ही. कडलास्कर व पं. शंकर अभ्यंकर यांचे शिष्य पं. महेश कुलकर्णी यांचे गायन, त्यानंतर विनायक ललित व तनुश्री जोग यांचे गायन, पं. भाई गायतोंडे यांचे शिष्य पं. विनायक नाईक यांच्या संकल्पनेतून साकारलेला कथक नृत्य कलाविष्कार कार्यक्रम डॉ. वैशाली दुधे यांच्या शिष्या आर्या महाजन व ऋतुजा कुलकर्णी सादर करतील.

महोत्सवाचा समारोप उस्ताद अस्लम खान (खुशरंग), उस्ताद अजीम खान, भजनसम्राट हभप निवृत्तीबुवा चौधरी व पं. शुभदा पराडकर यांचे शिष्य पं. उमेश चौधरी यांच्या गायनाने होणार आहे. सर्व कलाकारांना संवादिनी साथ विनायक ललित व स्मिता मनोहर; तबला साथ पं. महेश कान्होले, प्रसाद सुतार, विनायक नाईक, भक्ती जाधव, सुधिंद्र बागल; पखवाज साथ सोमदत्त माने; सहवाद्य साथ जगदिश म्हात्रे, तर निवेदन सोपान आढाव करणार आहेत.

संगीत रसिकांसाठी ही एक पर्वणी ठरणार असून शास्त्रीय संगीत, भजन आणि कथक नृत्याचा संगम या महोत्सवात अनुभवायला मिळणार आहे. या महोत्सवाचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वसंतशेठ पाटील, विनोद तोडेकर, अक्षय चौधरी, अनिल कोळी यांनी केले आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया!

मुख्यमंत्र्यांचे आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. हा जयंती सोहळा बाबासाहेबांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल रोजीच्या १३५व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.या बैठकीला सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहुल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचविणे हा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो.

डॉ. आंबेडकर जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी तसेच दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहचवण्याचा उपक्रम विभागामार्फत हाती घेण्यात आला असून जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांमध्ये संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जयंती सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी काही विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ड्रोनच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो चैत्यभूमी परिसरात सादर करण्यात येणार आहे.

या बैठकीत पोलीस पथक मानवंदना, चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, शिवाजी महाराज मैदानावरील भव्य निवास मंडप, तेथील आपत्कालीन व्यवस्थेसह, आरोग्य सुविधा, प्रदर्शन मंडप, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, लोकराज्य मासिकाचा विशेषांक, शासकीय जाहिरात व प्रसिद्धी याबाबत चर्चा झाली व याबाबत निर्देश देण्यात आले.

बैठकीत मुंबई महापालिकेच्या वतीने नियोजनाची सविस्तर माहिती सादरीकरणातून देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले.

## नव्या प्रणालीमुळे २९ कोटी दोन लाख ५४ हजार रुपये शासनाकडे जमा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शासनाने लागू केलेल्या आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रणालीमुळे रायगड जिल्ह्यातील कंत्राटदार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. आर्थिक वर्ष समाप्तीच्या शेवटच्या दिवसाअखेर बिल सादर न करता आल्याने तब्बल २९ कोटी दोन लाख ५४ हजार ६९४ रुपयांचा निधी सरकारकडे परत गेला आहे.

नव्या प्रणालीमध्ये परत गेलेला निधी पुन्हा मिळत नसल्याने बिल सादर करण्यासाठी वाढीव एक महिन्याची मुदत मागण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राज्य शासनाला सादर करावा लागणार आहे.वित्त विभागाच्या निर्णयानुसार १४ फेब्रुवारी २०२४ रोजी आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रणाली लागू करण्यात आली. त्यानंतर ग्रामविकास विभागाच्या १९ ऑगस्ट २०२४ च्यासरकारी निर्णयाद्वारे ही कार्यपद्धती जिल्हा परिषदांनाही लागू करण्यात आली.

ऑगस्ट २०२४ पासून रायगड जिल्हा परिषदेत आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रणाली कार्यान्वित झाली आहे. या प्रणालीअंतर्गत कोषागारातून मंजूर झालेली देयके केवळ ३६४ दिवसांपर्यंत वैध राहतात. ३६५ व्या दिवशी संबंधित निधी आपोआप परत जातो. या प्रणालीची जिल्ह्यातील बहुतांश कंत्राटदारांना आर्थिक संकटात सापडले आहेत.

आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रणालीद्वारे जिल्हा परिषदेला वर्षभरात निधी खर्च करण्याची संधी असते. कोणत्याही परिस्थितीत आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही बिले सादर करणे आवश्यक असतात. त्यानंतर हा आभासी निधी शासनाकडे परत जातो, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

**“ आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी बिले काढून घ्यावी लागतात. ३१ मार्चनंतर जिल्ह्यातील कंत्राटदारांचा तब्बल २९ कोटी दोन लाख ५४ हजार ६९४ रुपयांचा निधी लॅप्स झाला आहे. ही परिस्थिती राज्यात सर्वत्र असून, ती जितकी फायद्याची आहे, तितकीच अडचणीची भासत आहे. यासंदर्भात राज्य शासनाकडे पत्रव्यवहार करून एक महिन्याची मुदत वाढवण्याची मागणी करण्यात आली असून सर्व पातळीवर त्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.**

**-राहुल कदम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी**

### *आगामी अर्थसंकल्पावर होणार परिणाम?*

*ही प्रणाली जितकी सोयीची तितकीच त्रासदायक आहे. 'आभासी वैयक्तिक ठेव लेखा'मुळे जिल्हा परिषदेला प्रत्यक्ष निधी उपलब्ध होत नसून केवळ आभासी स्वरूपात निधी दाखवला जात आहे. त्यामुळे वर्षभर सरकारी निधीची गुंतवणूक करता न आल्याने व्याज उत्पन्नात मोठी घट झाली आहे. याचा परिणाम जिल्हा परिषदेच्या आगामी अर्थसंकल्पावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.*

### *परत गेलेला निधी*

*३० मार्च – १ कोटी ७२ लाख ४५ हजार ३३ रुपये,*
*३१ मार्च – १६ कोटी ६० लाख १७ हजार २८३ रुपये*

## नवी मुंबई नगररचना विभागाने जमा केला ५४१.८४ कोटींचा विक्रमी महसूल

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या नगररचना विभागास आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी रुपये ३४५ कोटी व सुधारित ४०० कोटी महसूल उद्दिष्ट देण्यात आले होते. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नगररचना विभागाने प्रभावी नियोजन, कार्यक्षम अंमलबजावणी व सुधारित प्रशासकीय प्रक्रियांच्या आधारे हे उद्दिष्ट लक्षणीयरित्या ओलांडत रू. ५४१.८४ कोटी महसूल प्राप्त केला आहे. ही कामगिरी महानगरपालिकेच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली आहे. नगररचना विभागाच्या या कामगिरीबद्दल महापौर श्रीम.सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

महानगरपालिकेमध्ये बांधकाम परवानगी प्रक्रिया ही BPMS/AutoDCR या ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविण्यात येत असून, या प्रणालीमुळे परवानगी प्रक्रियेत पारदर्शकता, गतीमानता व कार्यक्षमता वाढलेली आहे. परिणामी, परवानगी मंजूरीचा कालावधी कमी झाला असून महसूल संकलनात सातत्याने वाढ झालेली आहे.

नगररचना विभागामार्फत पुनर्विकास कक्षाची स्थापना केल्यामुळे रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती मिळालेली आहे. धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासास चालना मिळून सुरक्षित व नियोजित शहरी विकासाला बळकटी मिळाली आहे. यामुळे बांधकाम परवानग्यांमधून महसूल वाढीस देखील हातभार लागलेला आहे.

याशिवाय, विविध विभागांकडून प्राप्त होणाऱ्या ना हरकत दाखल्यांचे बीपीएमएस प्रणालीसोबत एकत्रीकरण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून, यामुळे भविष्यात परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ, समन्वित व वेळेची बचत करणारी होणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची विकास योजना शासनामार्फत मंजूर झालेली असून, त्या अनुषंगाने बांधकाम परवानगी प्रक्रियेमधील विविध तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी नगररचना विभागाने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक स्पष्टता व मार्गदर्शन प्राप्त केलेले आहे. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली व संबंधित अधिनियमातील तरतुदींविषयी स्पष्टता मिळाल्यामुळे परवानगी प्रक्रियेत येणारे अडथळे मोठ्या प्रमाणात दूर झाले आहेत.

आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे मार्गदर्शन तसेच शासन स्तरावर पाठपुरावा करुन बांधकाम परवानगीमध्ये येणाऱ्या अडचणी व्यक्तीशः आयुक्त व सहायक संचालक नगररचना श्री.सोमनाथ केकाण यांनी सोडवून घेतल्या. त्या अनुषंगाने बांधकाम परवानगी मंजूरीसाठी लागणारा कमी कालावधी, सुलभ व पारदर्शक प्रक्रिया, तसेच धोरणात्मक स्पष्टता या सर्व बाबींमुळे विकासक व नागरिकांकडून परवानगी प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद मिळालेला आहे. परिणामी, नगरचना विभागातील नगररचनाकार व सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रयत्नांमुळे महसूल संकलनात लक्षणीय वाढ होऊन नगररचना विभागास देण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करणे शक्य झाले आहे.

नगररचना विभागाच्या या यशस्वी कामगिरीमुळे नवी मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होत असून, शाश्वत व नियोजित शहरी विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.



**खोपोली : मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी शुक्रवारी खोपोली येथे भेट देऊन ज्येष्ठ उद्योजक व भाजप नेते यशवंत साबळे यांची भेट घेतली व त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे खोपोली शहराच्या विकासाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. खासदार बारणे यांनी खोपोलीच्या विकासाबाबत आपला दृष्टिकोन सकारात्मक असल्याचे सांगितले. यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे हेही उपस्थित होते.**

## स्पर्धा परीक्षामध्ये चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश



**अलिबागः प्रतिनिधी**

शालेयस्तरावरील विवीध स्पर्धा परिक्षांमध्ये अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले. शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकवर्गांच्या वतीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

युनिफाईड कौन्सिल तर्फे घेण्यात आलेल्या जी. के ऑलंपियाड स्पर्धेत शार्लिन निमिष वार्डे ही राज्यात सहावा क्रमांक पटकावला. महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत मराठी माध्यमातील ९२ विद्यार्थी तर इंग्रजी माध्यमातील १८८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मराठी माध्यम शाळेतील सान्वी सचिन पाटील, अद्वैत वैभव जोशी, श्रीराज दिनेश खोकराळे, ओम अमर तानुगडे आणि सान्वी नागेंद्र म्हात्रे गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले. इंग्रजी माध्यमात अक्षत अतुल कुलकर्णी, गार्गी प्रविणकुमार पाटील, मीत विवेक पाटील, सान्वी संजय पाटील, सिध्दार्थ दिपक रसाळ, प्रयास बाबासाहेब शिकारे, आयुष दत्तात्रय शिंदे यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

या व्यतिरिक्त इंडियन टॅलेंट ऑलंपियाड स्पर्धेत बाल गटात १०९ विद्यार्थी उतीर्ण झाले. मॅथ्स ऑलंपियाड मध्ये ज्यूनियर केजीतील २ विद्यार्थ्यांनी, २ विद्यार्थ्यांनी रौप्य तर १ विद्यार्थ्यानी कास्य पदक पटकावले, सिनयर केजी गटातील १० विद्यार्थ्यांनी रौप्यपदक पटकावले, इंग्लिश ऑलंपियाड सिनीयर केजी गटातील ३ विद्यार्थ्यांना सुवर्ण, ११ विद्यार्थ्यांना रौप्य, तर सात विद्यार्थ्यांना कास्यपदक मिळाले.

पान १ वरुन

### शरीर आणि मन दोन्ही सुदृढ होण्यासाठी खेळाची नितांत गरज -लोकनेते रामशेठ ठाकूर

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या भव्य आणि सुसज्ज कुस्ती संकुलामुळे ग्रामीण भागातील मल्लांना आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संकुलाची प्रगती अधिकाधिक चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे संकुल खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवेल आणि येथून कसलेले पैलवान घडतील.

या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप नेते एकनाथ देशेकर, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य आरती काठे, नगरसेवक हॅप्पी सिंग, दिनेश खानावकर, नितेश पाटील, नगरसेविका विजयश्री पाटील, अखिल भारतीय माथाडी कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भोईर, विनोद पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रभाकर पाटील, नाथाशेठ आगलावे, दीपक उलवेकर, अंकुश पाटील, प्रकाश खैरे, किरण दाभणे, बाळकृष्ण पाटील, बिना गोगारी, यतीन पाटील तसेच संकुलाचे संस्थापक अध्यक्ष पैलवान रूपेश पावशे, शालिक पावशे, चंद्रकांत पावशे, धर्मा पावशे, गुरूनाथ पावशे, कैलास पावशे, क्षितिज म्हात्रे, दर्शना पावशे, कुणाल काटे, महिला पैलवान अमोघा घरत, दिशा घनवट, अस्मिता मोरे यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्यासाठी आधुनिक सापळा

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरात वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून वनसंपदा अबाधित राखणे , वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन व्हावे या उद्देशाने खालापूर तालुका वन अधिकारी राजेंद्र पवार सातत्याने प्रयत्नशील असून, स्थानिक संस्था आणि निसर्गप्रेमींसोबत समन्वय साधत विविध उपक्रम राबवले जात आहेत.



तालुक्यात वाढता वन्यजीवांचा वावर, अपघातांची शक्यता आणि जखमी प्राण्यांच्या उपचारासाठी आवश्यक सुविधा लक्षात घेता, वन विभागाने हेल्प फाउंडेशन आणि आहिल फेन्सिंग अँड गॅबियन कंपनीच्या सहकार्याने एक अत्याधुनिक सापळा (पिंजरा) तयार करून घेत सापळा वन विभागाला सुपूर्द करण्यात आला. या निमित्ताने आयोजित छोटेखानी कार्यक्रमात वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, हेल्प फाउंडेशनचे सदस्य तसेच आहिल फेन्सिंग अँड गॅबियनचे प्रमुख अश्फाक लोगडे उपस्थिती होती.अश्फाक लोगडे यांनी डिझाइन केलेला हा पिंजरा निशुल्क स्वरूपात वन विभागाला सुपूर्द केला. यापुढेही अशा प्रकारचे सापळे तयार करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

यावेळी वन अधिकारी राजेंद्र पवार यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, लोकसहभागातूनच वन, वनसंपदा आणि वन्यजीवांचे संरक्षण शक्य असल्याचा विश्वास व्यक्त केला. तर वनपाल भगवान दळवी यांनी या उपक्रमात विशेष भूमिका बजावली. वनरक्षक घुटे, चंदन नागरगोजे, गायकवाड व प्राणीमित्र उपस्थित होते.

## सहयोग पतसंस्थेत तानाजी गव्हाणे यांचा सत्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह डिपार्टमेंट ऑडिटर्स असोसिएशन, नागपूरच्या अध्यक्षपदी तानाजी लक्ष्मण गव्हाणे यांची निवड झाल्याबद्दल सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेत त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.



सदर सत्कार सोहळा पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी अलिबाग येथील सेवानिवृत्त ऑडिटर संदीप गोठविरेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन गव्हाणे यांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी ठाणे येथील लेखापरीक्षक अशोक मगर, एस. जे. मुळक, संजय राणे, दत्ता पाटील पतसंस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, संचालक निळकंठ केमकर, व्यवस्थापक वैभव बोर्लीकर तसेच संस्थेचा कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमात संदीप गोठविरेकर यांनी संघटनेचे महत्त्व अधोरेखित करताना गव्हाणे यांच्या संघटनात्मक कार्याचा आढावा मांडला.सत्काराला उत्तर देताना श्री. तानाजी गव्हाणे यांनी आपल्या निवडीचे श्रेय अशोक मगर यांना देत मगर कुटुंबीयांशी असलेल्या स्नेहबंधांचा उल्लेख केला. तसेच, मिळालेल्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून को-ऑपरेटीव्ह डिपार्टमेंटमध्ये आलेली मरगळ दूर करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी नियोजन सहयोग पतसंस्थेच्या वतीने करण्यात आले.

# पनवेल प्रभाग 'ड'मध्ये स्वच्छतादूतांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल प्रभाग समिती 'ड' मधील स्वच्छता दूत (सफाई मित्र) यांच्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'क्षमता बांधणी' कार्यशाळेचे आयोजन पनवेल येथील रोहिदास वाडा येथील समाजमंदिर येथे आयोजित करण्यात आले. उपायुक्त डॉ वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार या कार्यशाळेत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता वाढीसोबतच त्यांच्या सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

या कार्यशाळेत ऑरनेट टेक्नॉलॉजी यांच्या वतीने घनकचरा व्यवस्थापनातील धोरणात्मक नियोजन, सौंदर्यशास्त्रीय डिझाईन व प्रशिक्षणामध्ये विशेष अनुभव असलेल्या डॉ. पुनम हुदार यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान स्वच्छता कर्मचाऱ्यांना स्वच्छतेच्या कामांशी संबंधित विविध महत्त्वाच्या



बाबींवर प्रशिक्षण देण्यात आले.

यामध्ये रस्ता सफाई कामगारांच्या सुरक्षिततेसंदर्भातील उपाययोजना, ओला व सुका कचरा वर्गीकरणाचे महत्त्व, महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षेबाबत माहिती तसेच मलनिस्सारण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य आणि सुरक्षा विषयक मार्गदर्शन यांचा समावेश होता.

या उपक्रमामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौशल्य वृद्धिंगत होणार आहे. या कार्यशाळेमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेत अधिक कार्यक्षमतेने योगदान देता येणार असल्याचा विश्वास स्वच्छता कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला.

"स्वच्छतेची नवीन वाटचाल, मिळवूनी हात, सफाई करू एकसाथ" या ध्येयाने प्रेरित होऊन सफाई कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, प्रभाग 'ड' चे सर्व स्वच्छता निरीक्षक तसेच सर्व सुपरवायझर उपस्थित होते. महिला व पुरुष स्वच्छता दूत तसेच नागरिकांनीही कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## वलप बनावट प्रमाणपत्र नोंदणी प्रकरणी आणखी एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

बनावट जन्म-मृत्यू प्रमाणपत्र नोंदणी प्रकरणी सोमवारी आणखी एका आरोपीला अटक करण्यात आली. पनवेल तालुक्यातील वलप ग्रामपंचायतीच्या नावाखाली तब्बल २६६० जन्म-मृत्यू दाखल्यांचा घोटाळा रायगड जिल्ह्यात उघड झाला होता. यवतमाळ, जळगाव आणि नांदेड आदि ठिकाणी देखील हजारोंच्या संख्येने बनावट जन्म मृत्यू प्रमाणपत्रांची नोंदणी केल्याचे उघड झाले होते. या प्रकरणी दोन आरोपींना यापूर्वीच गजाआड करण्यात आले.

पनवेल तालुका पोलिसांनी संशयित आरोपींना यवतमाळ पोलिसांच्या ताब्यात दिले. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. वलप ग्रामपंचायतीच्या नावाचा वापर या गुन्ह्यात कसा झाला, याचा शोध पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणातील तिन्ही संशयितांना पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यापैकी दोघांची रवानगी न्यायालयीन कोठडीत तर २२ वर्षीय संशयित आरोपीला पोलीस कोठडी सुनावण्यात आली. एका दाखल्यासाठी ५ ते १० हजार रुपये घेऊन हे संशयित जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची नोंदणी करत होते. सीआरएस पोर्टलवरून जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची नोंदणी केली जाते. या पोर्टलमधील काही त्रुटींचा फायदा या सायबर गुन्हेगारांनी घेतला.

# सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन बसवा -ॲड.घरत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये 'सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन' बसवण्याची महत्त्वपूर्ण मागणी नगरसेविका ॲड. शिवानी घरत यांनी महासभेत उपस्थित केली. महिलांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सन्मानाशी निगडित असलेल्या या विषयामुळे सभागृहात सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी व्यासपीठावर महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे तर सभागृहात सभागृह नेते, विविध समित्यांचे



सभापती, विरोधी पक्ष नेत्यांसह नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा नुकतीच आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शहर विकासासह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना नगरसेविका ॲड. शिवानी घरत यांनी महिलांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी अधोरेखित केल्या. मासिक पाळीच्या काळात महिलांना अनेक शारीरिक व मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषतः सार्वजनिक ठिकाणी अचानक अशा परिस्थितीचा सामना करावा लागल्यास महिलांना मोठी गैरसोय होते, असे त्यांनी नमूद केले.

स्वच्छतागृहांमध्ये सॅनिटरी नॅपकिन सहज उपलब्ध नसल्यामुळे महिलांना अडचणींचा सामना करावा लागतो, तसेच याचा त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन बसवणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. "ही केवळ सुविधा नसून महिलांच्या सन्मानाशी आणि मूलभूत गरजांशी संबंधित बाब आहे," असे स्पष्ट करत त्यांनी महापालिकेने या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली.

या विषयावर सभागृहातील अनेक सदस्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत महिलांसाठी अशा सुविधांची गरज अधोरेखित केली.



**पनवेल : पंचायत समितीच्या सभापती रंजना सदाशिव वास्कर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भाजप अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जि.प. सदस्य अमित जाधव. सोबत उपसभापती भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, विश्वजित पाटील आदी.**

## कारची काच फोडून १३ लाखांचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

रत्नागिरीहून मुंबईच्या दिशेने प्रवासात असलेल्या एका कुटुंबाची कार हॉटेलबाहेर पार्क केलेली असताना, चोरट्यांनी वाहनाची काच फोडून त्यातील १३ लाख ७३ हजारांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली.

घाटकोपर येथील रहिवासी योगेश रमेश शिंदे (वय ४१) हे कुटुंबासह गाडीने रत्नागिरीहून मुंबईला परतत होते. शिंदे कुटुंबीय कल्ले गाव येथील गो ग्रीन हॉटेलमध्ये जेवण्यासाठी थांबले. शिंदे यांनी गाडी हॉटेलच्या पार्किंगमध्ये उभी केली. याच कालावधीत चोरट्याने शिंदि यांच्या गाडीची काच फोडून गाडीत ठेवलेल्या पर्समधील १० तोळ्यांचे मंगळसूत्र, आठ तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्या आणि चार तोळ्यांची सोन्याची पाटली तसेच ५० हजारांची रोख रक्कम आणि कागदपत्रे चोरून नेली. जेवण झाल्यानंतर शिंदे कुटुंबीय दीड तासानंतर परतले असता, त्यांना गाडीच्या डाव्या बाजूची पाठीमागील काच फुटलेली दिसली. त्यांच्या तक्रारीनंतर पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा नोंदवला.

# पनवेल-अलिबाग एसटी सेवा ठप्प; रात्री प्रवाशांची गैरसोय वाढली!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलहून अलिबाग, रेवदंडा, मुरुड आणि वडखळ या भागात जाणाऱ्या प्रवाशांना रात्री ८ ते ८.३० नंतर एसटी बस उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या वेळेनंतर नियमित बस सेवा थांबत असल्याने प्रवाशांना इतर अनियमित गाड्यांवर अवलंबून राहावे लागते. मुंबईहून कामानिमित्त येणाऱ्या चाकरमान्यांना रात्री उशिरा आल्यानंतर राहण्यासाठी लॉज शोधावी लागते किंवा एसटी स्थानकातच रात्र काढावी लागते. या समस्येमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.वडखळ प्रवाशांचे हाल; वाहतूक



सुविधांची कमतरता

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे केंद्र असलेल्या वडखळ गावातही एसटी सेवेकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. रात्री ९ नंतर पनवेलहून वडखळकडे जाण्यासाठी अलिबाग मार्गाव्यतिरिक्त इतर बस थांबत नसल्याची तक्रार प्रवासी राजेश म्हात्रे यांनी केली आहे.

पनवेल व अलिबाग एसटी डेपोच्या कामकाजावरही संशय व्यक्त केला जात आहे. खासगी वाहनचालक प्रवाशांकडून जादा भाडे (सुमारे ३०० रुपये) आकारून त्यांची लूट करत असल्याच्या तक्रारी आहेत. काही नागरिकांनी एसटी अधिकाऱ्यांसोबत संगनमत असल्याचाही आरोप केला आहे. तसेच, डेपोमधील संपर्क क्रमांक कायम व्यस्त किंवा बंद असतात आणि अधिकाऱ्यांचे वर्तन उद्धट असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत.

शासनाकडून चांगल्या सेवांची अपेक्षा असताना प्रत्यक्षात एसटी सेवा कोलमडलेली दिसत आहे. चालक व कंडक्टरांची कमतरता, जुन्या बस आणि विस्कळीत वेळापत्रक यामुळे प्रवासी त्रस्त आहेत. रात्रीच्या अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करणे, वडखळ येथे बस थांबे वाढवणे आणि डेपोमधील गैरप्रकारांची चौकशी करणे, या मागण्या आता जोर धरत आहेत.

# दीड कोटींचा मुद्देमाल पोलिसांनी केला फिर्यादींना सुपूर्द

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या पनवेल विभागांतर्गत येणाऱ्या पनवेल शहर, पनवेल तालुका आणि खांदेश्वर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध गुन्ह्यांत जप्त केलेला एकूण १ कोटी ५७ लाख ६४ हजार ५७० रुपये किमतीचा मुद्देमाल आज मूळ मालकांना सन्मानपूर्वक परत करण्यात आला. पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे आयोजित या कार्यक्रमामुळे आपली चोरीला गेलेली मालमत्ता पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

यामध्ये ८९ लाख रुपये किमतीची २३ चारचाकी वाहने, ७ लाख २५ हजार रुपये किमतीचे ४२ मोबाईल फोन, ५९ लाख ५५ हजार ५७० रुपये किमतीचे ५८० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १ लाख



८४ हजार २०० रुपये किमतीच्या ८ दुचाकी वाहनांचा समावेश आहे. आपली हक्काची मालमत्ता परत मिळाल्याबद्दल नागरिकांनी पोलिसांच्या कार्यतत्परतेचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

ही यशस्वी कामगिरी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, परिमंडळ ३ चे पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते आणि पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी आपल्या पथकासह महत्त्वाची भूमिका बजावली.

# घरगुती एलपीजीपुरवठा सुरळीत; अफवांपासून दूर राहण्याचे इंडियन ऑईल कंपनीचे आवाहन

**कळंबोली, पनवेल : बातमीदार**

देशभरात घरगुती LPG चा पुरवठा सध्या पूर्णपणे सामान्य असून तो स्थिर, पुरेसा आणि सतत निरीक्षणाखाली असल्याची माहिती IndianOil ने दिली आहे. जागतिक ऊर्जा बाजारावर परिणाम करणाऱ्या भू-राजकीय घडामोडींनंतरही घरगुती LPG ला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.

IndianOil कडून दररोज सुमारे २८ लाख LPG सिलिंडर वितरित केले जात असून, ही संख्या भू-राजकीय तणाव सुरू होण्यापूर्वीच्या पातळीशी सुसंगत आहे. त्यामुळे देशात LPG च्या पुरवठ्यात कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

ग्राहकांना LPG रीफिल



बुकिंगसाठी SMS आणि IVRS यांसारख्या डिजिटल माध्यमांचा वापर करण्याचे प्रोत्साहन दिले जात आहे. सध्या जवळपास ८७% बुकिंग डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे होत असून, वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (DAC OTP) चा वापर केला जात आहे.

दरम्यान, काही वितरकांकडून गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर IndianOil ने कडक कारवाई सुरू केली आहे. काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी विविध पथकांकडून आतापर्यंत ७,५०० हून अधिक तपासण्या करण्यात आल्या असून १४१ वितरकांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ५ वितरकांचे निलंबनही करण्यात आले आहे.

तसेच, राज्य सरकारांच्या समन्वयाने देशभरात सुमारे ६८,००० छापे टाकण्यात आले, ८५५ FIR नोंदवण्यात आले आणि ४८,००० हून अधिक सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत.

IndianOil ने सर्व Indane ग्राहकांना आश्वस्त केले आहे की LPG चा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून कोणतीही कमतरता नाही. ग्राहकांनी घाबरून जास्त बुकिंग किंवा साठेबाजी करू नये, तसेच अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत स्रोतांवरच अवलंबून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारी किंवा मदतीसाठी ग्राहकांनी indanecareho@indianoil.in या ईमेलवर संपर्क साध याचे आव्हानही करण्यात आले आहे.

# मोठे भोममध्ये आज 'सिंह गर्जला रणी' नाट्यप्रयोग

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोठेभोम हे नाट्यवेडे गाव असून, गेल्या अनेक पिढ्यानंपिढ्या चालत आलेली मोठेभोम गावाची नाट्य चळवळ आजच्या बदलत्या, धावपळीच्या काळातही या गावाने जिवापाड जोपासली असून, या नाट्य चळवळीतल्या मोठेभोम गावात श्री हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने, श्री हनुमान जयंतीचे औचित्य साधून, किल्लेदार वीरपुत्र, मुरारबाजी देशपांडे यांच्या अलोकिक बलिदानाचे वेध घेणारी 'सिंह गर्जला रणी' या मदन राजवाडेकर लिखित व विजय केणी दिग्दर्शित तसेच सुनील पाटील, चंद्रशेखर पाटील सहदिग्दर्शक ऐतिहासिक नाट्य कलाकृतीचे सादरीकरण आज शनिवारी (दि.४) रात्री नऊ वाजता करण्यात येणार आहे.

यावेळी रंगभूमीची सेवा करणाऱ्या नटवर्य स्वर्गीय नाना पाटील, नाट्यभूषण स्वर्गीय प.मा. पाटील, दिग्दर्शक स्वर्गीय भाऊ ठाकूर यांच्यासह रंगभूमीवरील सर्वच दिवंगत नाट्य कलाकारांना अभिवादन करून नाट्य प्रयोगाची सुरुवात करण्यात येणार आहे. दरम्यान या ऐतिहासिक नाट्यप्रयोगामुळे मोठेभोम गावात गेले आठ दिवस ऐतिहासिक वातावरण निर्माण झाले असून नाट्य प्रयोगाची जय्यत तयारी झाली आहे. गुरुवर्य वसंतदादा चिर्लेकर हे या नाट्यप्रयोगाचे प्रेरणास्थान आहेत.

नाटकात बबन पाटील, अनंत पाटील, संग्राम ठाकूर, विजय केणी, चंद्रशेखर पाटील, सुनील पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अभिजीत पाटील,अशितोष ठाकूर,सर्वेश पाटील,निलेश पाटील,अर्चना पाटील, श्रावणी म्हात्रे,राजेश पाटील,रितेश पाटील, साई ठाकूर, उदय पाटील, अतुल पाटील, संगम नारंगीकर, साई पाटील ,कमलाकर पाटील, विवेक पाटील, साहिल केणी, दवेश नारंगीकर आदी जुने, नवे कसलेले कलाकार आपल्या अभिनयाचे रंग उधळणार आहेत. ध्वनी ध्रुवराज म्हात्रे,प्रकाश योजना राजेंद्र जोशी, नेपथ्य चंद्रशेखर पाटील, भगवान पाटील, रंगभूषा नंदकुमार चिरनेरकर, वेशभूषा चंद्रशेखर पाटील, संगीत गणेश घरत, चैतन्य कडू, पार्श्वसंगीत उमेश गावंड, नाटकातील प्रसंगफुलविणार आहेत.

## डिजिटल अटकेची धमकी देत लूट

**पनवेल : वार्ताहर**

दहशतवादी विरोधी पथकाचे अधिकारी असल्याची थाप मारून डिजिटल अटकेची भीती दाखवत एका व्यापाऱ्याला तब्बल १ कोटी ५४ लाख ९८ हजाराला लुटले. या प्रकरणी चार व्यक्तींविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी हे स्टील मार्केटमधील व्यावसायिक असून सध्या निवृत्तीचे जीवन जगत आहेत. त्यांच्या मोबाइलवर आलेल्या फोनवरून समोरील व्यक्तीने स्वतःची ओळख दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी म्हणून करून दिली. दहशतवादी संघटनेशी तुमचे आर्थिक व्यवहार आले असून तुम्हाला डिजिटल अटक करावी लागणार, अशी भीती दाखवत ऑनलाइन पद्धतीने पैसे लुटण्यात आले.

## संपादकीय

# ‘अवकाळी’चा फटका

अलीकडच्या काही वर्षांत महाराष्ट्रासह संपूर्ण देशात हवामानाच्या पॅटर्नमध्ये मोठे बदल दिसून येत आहेत. ऋतूंचे चक्र जणू विस्कळीत झाले आहे. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, तर कधी ऐन उन्हाळ्यात पडणारा अवकाळी पाऊस या सर्व घटनांनी सामान्य जनजीवन आणि विशेषतः शेतीव्यवस्था मोठ्या संकटात सापडली आहे. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण झाली असून राज्यातील अनेक भागांत उन्हाळ्यात पावसाच्या सरी कोसळत आहेत.

**मराठवाडा, विदर्भ, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण अशा सर्वच भागांत पावसाने हजेरी लावली आहे. काही ठिकाणी गारपीटही होत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी पिके काढणीच्या अवस्थेत असताना अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. कोकण पट्ट्यातही अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. आंबा आणि काजू ही येथील मुख्य नगदी पिके असून त्यावर हजारो कुटुंबांचे उत्पन्न अवलंबून असते, परंतु या अवकाळी पावसामुळे आंब्याच्या मोहोराला फटका बसला आहे, तर काजूच्या उत्पादनावरही विपरीत परिणाम झाला आहे. परिणामी येथील शेतकरी आणि बागायतदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. कडधान्यांच्या पिकांनाही मोठा फटका बसल्याने बाजारातील पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. हवामानातील या अनिश्चिततेमागे जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल हे प्रमुख कारण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. औद्योगिकीकरण, जंगलतोड, प्रदूषण आणि हरितगृह वायूंच्या वाढत्या प्रमाणामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. यामुळे पावसाचे स्वरूप आणि वितरण बदलत आहे. या असंतुलित हवामानामुळे शेती नियोजन करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. पेरणी कधी करावी, कोणते पीक घ्यावे, पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे या सर्व बाबी अनिश्चित बनल्या आहेत. यामुळे शेतीतील जोखीम वाढली आहे. त्यातच बाजारभावातील चढउतार आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकऱ्यांची स्थिती अधिकच बिकट झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. राज्य सरकारने तातडीने नुकसानग्रस्त भागांचा आढावा घेऊन मदतकार्य सुरू केले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली असून पंचनामे त्वरित करून नुकसानभरपाई दिली जाईल, असे आश्वासन दिले आहे. ही बाब निश्चितच दिलासादायक आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. आधुनिक शेती पद्धधती, हवामानस्नेही पीक पद्धती आणि कमी कालावधीत येणारी व हवामान बदलाला तग धरणारी वाण विकसित करणे आवश्यक आहे. कृषी संशोधन संस्था आणि विद्यापीठांनी यासाठी अधिक प्रयत्न करायला हवेत. यासोबतच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी पर्यायी व्यवसायांना चालना देणेही महत्त्वाचे आहे. दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन यांसारख्या पूरक व्यवसायांमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते आणि एकाच पिकावर अवलंबून राहण्याचा धोका कमी होऊ शकतो. शेवटी शेतकरी हा देशाचा कणा आहे. त्याच्या अडचणी समजून घेऊन त्याला योग्य वेळी मदत करणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे.**

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव : आरोग्यसमृद्ध महाराष्ट्राची लोकचळवळ

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या राज्यव्यापी अभियानाला एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, सामान्य रुग्णालय येथे आयोजित ‘माझं गाव,आरोग्य संपन्न गाव’ विभागीय कार्यशाळेचे सहभागी झाले होते. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक




सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार ‘आरोग्यसंपन्न गाव’ किताब**

‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टयांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना ‘आरोग्यसंपन्न गाव’ म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**दोन ते पाच कोटींचे पुरस्कार**

राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

**–जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक पं. नारायणराव व्यास

पं. नारायणराव गणेश व्यास हे शास्त्रीय गायक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म ४ एप्रिल १९०२ रोजी कोल्हापूरला झाला. त्यांचे वडील उत्तम गायक, सतारवादक होते. त्यांचे वडील बंधू शंकर व्यास पं. विष्णू दिगंबर पलुसकरांचे शिष्य होते. ते १९११ साली विष्णू दिगंबरांच्या गांधर्व महाविद्यालयात दाखल झाले. नऊ वर्षांच्या शिक्षणानंतर आपल्या बंधूंसह ते १९२२ साली अहमदाबादला आले व तेथील गांधर्व महाविद्यालयात अध्यापन करू लागले. त्यांनी १९३७ साली मुंबईत दादर येथे व्यास संगीत विद्यालयाची स्थापना बंधू शंकर यांच्या सहकार्याने केली.

नारायण व्यासांचा आवाज पातळ, गोड, सुरेल होता. भरपूर दमसास, सुस्पष्ट सरळ, सपाट ताना हे त्यांच्या गायकीचे वैशिष्ट्य होते. ग्वाल्हेर गायकीची शैली आत्मसात केल्यावर नारायण व्यास यांनी मास्तर कृष्णराव आणि बालगंधर्व यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून आपले गाणे ढंगदार केले. शास्त्रीय संगीताबरोबरच ते ठुमरी व भजनेही गात असत. एचएमव्ही कंपनीने १९२९ ते १९४२ या काळात त्यांच्या ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध केल्या.

दुर्गा रागातील ‘सखी मोरी’, तिलक कामोद रागामधील ‘नीर भरन कैसे जाऊँ’, बहार रागामधील



‘फुलवाले कन्थ’, मांड रागामधील ‘बालम मोरा सुनी हो’ ही ठुमरी, अशा त्यांच्या ध्वनिमुद्रिका लोकप्रिय झाल्या आणि त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांना निरनिराळ्या ठिकाणांहून मैफलींची निमंत्रणे येऊ लागली आणि भारतभर त्यांनी अनेक मैफली गाजवल्या.

‘कहां के पथिक कहां’, ‘राधेकृष्ण बोल मुख’से आणि ‘ठुमक चलत रामचंद्र’ ही त्यांची विशेष लोकप्रिय झालेली भजने होत. विष्णू दिगंबरांमुळे नारायण व्यासांना पंजाबमध्येही विशेष लोकप्रियता लाभली. लोकांना काय पाहिजे हे ओळखण्याची अचूकता त्यांच्याजवळ होती, म्हणूनच त्यांना हे यश मिळाले. आपले गुरुबंधू विनायकबुवा पटवर्धन यांच्याबरोबर त्यांची गायन जुगलबंदीही भारतभर लोकप्रिय होती. त्यांची ‘मालगुंजी’ रागाची, जुगलबंदीची ध्वनिमुद्रिकाही लोकप्रिय ठरली.

नारायण व्यास यांना १९७७मध्ये संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला. मध्य प्रदेश सरकारने १९८२मध्ये तानसेन पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या पुणे अधिवेशनात आणि पुण्याच्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवातही त्यांचा सत्कार करण्यात आला. शास्त्रीय संगीताचे लोकप्रिय गायक म्हणून नारायण व्यासांचे नाव रसिकांच्या नेहमीच लक्षात राहील. मास्टर नवरंग नागपुरे, वसंतराव राजोपाध्ये, विमल पत्की, शरद जांभेकर, प्रसाद सावकार व पुत्र विद्याधर व्यास हे त्यांचे प्रमुख शिष्य होत. नारायण व्यास यांचे १ एप्रिल १९८४ रोजी निधन झाले.

**–मधुवंती पेठे**

## बदलते तंत्रज्ञान

### १५ मिनिटात व्हॉट्सॲपचा मेसेज होईल डिलीट

तुम्ही WhatsApp युजर्स असाल तर ही बातमी तुमच्यासाठी खास आहे. WhatsApp लवकरच एक नवीन प्रायव्हसी फीचर आणू शकते, कंपनी युजरचा अनुभव सुधारण्यासाठी



ॲपमध्ये नवीन फीचर्स जोडते. आता कंपनी एका अशा फीचरवर काम करत आहे, जे मेसेज रिसीव्हरने तुमचा मेसेज वाचताच आपोआप अदृश्य (Vanish) होईल.

WhatsAppच्या या नव्या फीचरचे नाव After reading असे आहे. WhatsApp डेव्हलपमेंट मॉनिटरिंग वेबसाइट WABetaInfoने अँड्रॉइड बीटा व्हर्जनमध्ये हे लेटेस्ट फीचर पाहिले आहे. रिपोर्टनुसार नवीन टूल युजर्सला चॅटवर अधिक नियंत्रण देईल.

या फीचर्समागील कल्पना सोपी आहे. एकदा चालू केल्यावर, मेसेज रिसिव्हरचा मेसेज वाचल्यानंतर ते आपोआप अदृश्य होईल. रिपोर्टनुसार WhatsApp मेसेज ओपन झाल्यानंतर १५ मिनिटांची काउंटडाउन सुरू करेल आणि टाइमर संपल्यानंतर मेसेज सेंडर आणि रिसीव्हर दोघांच्या चॅटमधून डिलीट होईल. जर मेसेज उघडला गेला नाही तर तो २४ तास उपस्थित राहील, त्यानंतर तो आपोआप गायब होईल. अँड्रॉइड व्हर्जन २.२६.१२.२ साठी व्हॉट्सॲप बीटामध्ये हे फीचर आढळले होते, परंतु ते अद्याप विकसित होत आहे आणि बीटा चाचणीसाठी उपलब्ध नाही.

**हे फीचर ‘या’ युजर्ससाठी उपयुक्त**

ओटीपी, पासवर्ड, अॅड्रेस किंवा व्हेरिफिकेशन कोड यासारखी गोपनीय माहिती शेअर करणाऱ्या WhatsApp युजर्ससाठी हा नवा पर्याय उपयुक्त ठरेल. सध्या, WhatsApp वरील मेसेज सहसा चॅटमध्ये राहतात जोपर्यंत ते मॅन्युअली डिलीट केले जात नाहीत किंवा गायब झालेल्या मेसेजचा वापर करून पाठवले जात नाहीत. नवीन ऑटो-डिलीट सिस्टमच्या मदतीने, युजर्स मजकूर पाठवू शकतात जे पाहिल्यानंतर लगेचच स्वयंचलितपणे हटवले जातात, ज्यामुळे चॅट हिस्ट्रीमध्ये खाजगी तपशील शिल्लक राहण्याची शक्यता कमी होते.

**नवीन फीचर आल्यानंतर १५ मिनिटांत मेसेज गायब**


सामान्यतः WhatsApp मेसेज वाचताना ब्लू टिक दाखवते, परंतु काही युजर्स प्रायव्हसीसाठी ही सेटिंग बंद करतात. सध्या Disappearing Messagesसह २४ तास, ७ दिवस आणि ९० दिवसांचा पर्याय उपलब्ध आहे, परंतु हे नवीन फीचर आल्यानंतर १५ मिनिटांत मेसेज गायब होईल. सध्या हे फीचर किती काळ रोलआउट करता येईल, याबाबत कोणतीही माहिती नाही.

# ज्येष्ठ कलावंत निळू फुले

निळू फुले हे मराठी रंगभूमी व चित्रपट क्षेत्रातील ज्येष्ठ कलावंत अभिनेते होते. कथा अकलेच्या कांद्याची या लोकनाट्याद्वारे पदार्पण केले. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसोबत काम केलेले आहे.

निळू फुले यांचा जन्म ४ एप्रिल १९३० रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील लोखंड आणि भाजी विकून मिळणाऱ्या पैशावर चरितार्थ चालवत असत. निळू फुलेंनी मॅट्रिकपर्यंतच शिक्षण घेतले, पण आपली अभिनयाची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांनी स्वतः ’येरा गबाळ्याचे काम नोहे’ हा वग लिहिला. त्यानंतर पु. ल.. देशपांडे यांच्या नाटकात ’रोंगे’ची भूमिका साकारून त्यांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले, मात्र ’कथा अकलेच्या कांद्याची’ या वगनाट्यातील भूमिकेमुळे ते कलाकार म्हणून खऱ्या अर्थाने पुढे आले.

नाटक आणि सिनेमा या दोन्ही क्षेत्रात निळूभाऊंनी स्वतःचा ठसा उमटवला. नायक आणि खलनायक अशा दोन्ही भूमिका करणाऱ्या निळूभाऊंचे ग्रामीण आणि शहरी जीवनाचे निरीक्षण अतिशय अचूक होते. या निरीक्षणाचा त्यांनी अभिनयात खुबीने उपयोग केला. सहज सुंदर अभिनय



**निमित्त**

करणाऱ्या निळूभाऊंनी काल्पनिक कथेतला कलाकार जिवंत केला.


नाट्यरसिक आणि सिनेप्रेमींना कलाकार म्हणून अत्यंत प्रिय असलेले निळूभाऊ समाजवादी विचारधारेशी जोडलेले होते. निळूभाऊंनी राष्ट्र सेवा दलाचा कार्यकर्ता म्हणून समाजाची सेवा केलेली आहे. ते समाजवादी विचारवंत नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या विचाराने प्रेरित होते. मुळातच नास्तिक१ असलेल्या फुलेंनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती संघटनेसाठी अंधश्रद्धाविरोधी प्रबोधन, सत्याग्रह, आंदोलनात सक्रिय सहभाग दिला आहे. स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्या नंतरही पिढी घडविणारी राष्ट्रीय संघटना असलेल्या राष्ट्र सेवादलाच्या कला पथकाचे सदस्य राहिलेले निळू फुले यांनी १९५८च्या सुमारास पुण्यातील कला पथकाचे नेतृत्व केले.

निळू फुले यांचे १३ जुलै २००९ रोजी पहाटे दोनच्या सुमारास निधन झाले. अन्ननलिकेच्या कर्करोगाने अंथरुणाला खिळून असलेल्या निळू फुले यांची प्रकृती खालावल्याने त्यांना पुण्यातील जहांगीर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

निळू फुले यांनी ’कथा अकलेच्या कांद्याची’ या लोकनाट्याद्वारे रंगमंचावर पदार्पण केले. ’एक गाव बारा भानगडी’ या चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले आणि सलग ४० वर्षे या चित्रपटसृष्टीत व रंगभूमीवर कारकीर्द केली. निळू फुले यांनी १२ हिंदी चित्रपटांत भूमिका केल्या आहेत, तर मराठी भाषेतल्या जवळपास १४० चित्रपटांमधून काम केले आहे. त्यांच्या भूमिकांपैकी ’चोरीचा मामला’, ’पुढचं पाऊल’, ’शापित’, ’सामना’, ’सिंहासन’ यांतील भूमिका विशेष गाजल्या.

चित्रपटात निळू फुले यांनी अनेक खलनायकाच्या भूमिका साकारल्या, परंतु प्रत्यक्षात ते चांगला माणूस होते. त्यांनी अभिनयाचा ठसा उमटवला आणि सामाजिक कार्यायातही आपले योगदान दिले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### वापरलेल्या तेलाचा सतत वापर आरोग्यासाठी घातक



खरंतर एकदा वापरलेले तेल पुन्हा वापरण्यामुळे आपल्या आरोग्याचे नुकसान होते. बरेच लोक स्वयंपाकासाठी मोहरीचे तेल, ऑलिव्ह ऑईल किंवा रिफाइंड तेल वापरतात परंतु ते वापरण्याची योग्य पद्धत माहित नसते, पण दुसरा पदार्थ तयार करण्यासाठी एकदा वापरलेल्या तेलाचा पुनर्वापर करणे हे खूप हानिकारक ठरू शकते. खरंतर एकदा वापरलेले तेल पुन्हा वापरण्यामुळे आपल्या आरोग्याचे नुकसान होते. बरेच लोक स्वयंपाकासाठी मोहरीचे तेल, ऑलिव्ह ऑईल किंवा रिफाइंड तेल वापरतात परंतु ते वापरण्याची योग्य पद्धत माहीत नसते.

स्वयंपाक तेल वापरण्यासाठी विविध पद्धती आहेत, पण तुमच्या माहितीसाठी सांगतो की, स्वयंपाकाचे तेल जास्त वेळ शिजवणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

पोटाचे आजार : उरलेल्या तेलाचा वारंवार पुनर्वापर केल्यास पोटाच्या समस्या वाढू शकतात. वापरलेले तेल पुन्हा वापरल्याने, तुम्हाला अल्सर, सिडिटी, जळजळ असे अनेक त्रास होऊ शकतात. एवढेच नव्हे तर उरलेल्या तेलाचा वापर आपल्या पचनासाठीही चांगला नसतो. यामुळे अपचन, बद्धकोष्ठता आणि जुलाब यासारख्या समस्याही उद्भवू शकतात.

मधुमेह आणि लठ्ठपणा : तळणानंतर उरलेले तेल पुन्हा वापरल्याने लठ्ठपणाही होऊ शकतो. एवढेच नाही तर उरलेल्या तेलापासून बनवलेले अन्न सेवन केले तर मधुमेहाचाही त्रास होऊ शकतो. त्यामुळे वापरलेले तेल पुन्हा वापरणे शक्य तितके टाळावे.

फॅटी ॲसिडमुळे नुकसान : तेलामध्ये फॅट असते हे फार कमी लोकांना माहीत आहे. जर तुम्ही तेल वारंवार गरम करून ते वापरत असाल तर ते आरोग्यासाठी घातक ठरू शकते. त्यामुळे तेच तेल पुन्हा पुन्हा वापरणे योग्य नाही.

अनेकांना तेल पुन्हा पुन्हा गरम करून ते वापरण्याची सवय असते. त्याच पॅनमध्ये पुन्हा पुन्हा तळू नका. तुम्हीही असे करत असाल तर सावध व्हा कारण हे अनेक आजारांचे लक्षण असू शकते.

# एका दिवसात तब्बल १२ कोटी महसूल जमा!

**अलिबाग : प्रतिनिधी**

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी जागा जमिनी खरेदी खरेदी करण्यासाठी जिल्ह्यातील निबंधक कार्यालयांमध्ये मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. एकाच दिवसात तब्बल १२ कोटी रुपयांचा महसूल मुद्रांक शुल्कापोटी जमा झाला. ३१ मार्च रोजी जिल्ह्यात ६६८ दस्तांची नोंदणी करण्यात आली.




एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला रेडी रेकनरचे दर बदलतात. त्यामुळे मार्च महिन्याच्या अखेरच्या टप्प्यात जागा जमिनीच्या नोंदणीला वेग येतो. संभाव्य मुद्रांक शुल्क वाढ टाळण्यासाठी दस्त नोंदणी मोठ्या प्रमाणात केली जाते. याचाच प्रत्यय ३१ मार्च रोजी रायगडकरांना आला. रायगड जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करण्यासाठी मंगळवारी नागरिकांनी गर्दी केली होती. एका दिवसात ६६८ दस्त नोंदणी झाली. ११ कोटी ९० लाख ५८ हजार ४०५ रुपयाचा महसूल मुद्रांक शुल्काच्या रूपाने शासनाच्या तिजोरीत जमा झाला.

संभाव्य दस्त नोंदणी लक्षात घेऊन नोंदणी महानिरीक्षकांनी सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालय सुरू ठेवण्याचे निर्देश दिले होते. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी मालमत्तेची दस्त नोंदणी करण्यासाठी जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालय सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे शेवटच्या दिवशी सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये मोठी गर्दी झालेली पाहायला मिळाली. मोठ्या प्रमाणात दस्त नोंदणी झाल्याने शेवटच्या दिवशी शासनाच्या तिजोरीत करोडीचा महसूल जमा झाला आहे.

जिल्ह्यातील २० दुय्यम कार्यालयात ऑफलाईन ४०८ तर ऑनलाइन २६० अशी एकूण ६६८ दस्त नोंदणी ३१ मार्च रोजी झाली आहे. यामध्ये मुद्रांक शुल्क ऑफलाईन ११ कोटी ३३ लाख ६ हजार ८४, ऑनलाइन २ लाख ४८ हजार २६६ तर नोंदणी शुल्क ऑफलाईन ५ लाख ३० हजार ४ हजार ४७०, ऑनलाईन १ लाख ९९ हजार ५८५ अशी एकूण ११ कोटी ९० लाख ५८ हजार ४०५ महसूल एका दिवसात जमा झाला आहे अशी माहिती जिल्हा उपनिबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी अमित शेडगे यांनी दिली.

गेल्या काही वर्षात रायगड जिल्ह्यात जागा जमिनींना मोठी मागणी आली आहे. सागरी मार्गाने आणि रस्ते मार्गाने दक्षिण मुंबई रायगडशी थेट जोडली गेल्याने गुंतवणूकदारांनी आपला मोर्चा या ठिकाणी वळवला आहे. नवी मुंबई विमानतळाच्या विकासामुळे पनवेल उरण मधील जागा जमिनींना मोठी मागणी निर्माण झाली आहे. तर अलिबाग पेण कर्जत खोपोली येथे मोठ्या प्रमाणात जागा जमिनींचे व्यवहार सुरू झाले आहेत. याचा प्रत्यय ३१ मार्च रोजी च्या नोंदणी करून पुन्हा एकदा आला.

## स्व. अजित पवार यांच्या नावाने रोहा शहरात वास्तू असावी

### भाजप नगरसेवक रोशन चाफेकर यांची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा-अष्टमी नगरपरिषदेची सर्वसाधारण बैठक दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत शहराच्या विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण व सकारात्मक निर्णय घेण्यात आले. विविध विषयांवर सखोल चर्चा करून नागरिकांच्या सोयीसुविधा वाढविण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला.

यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक रोशन चाफेकर यांनी सभागृहात एक महत्त्वपूर्ण मागणी मांडली. त्यांनी सांगितले की, स्व. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने रोहा शहरात एखादी वास्तू उभारण्यात यावी किंवा एखाद्या महत्त्वाच्या वास्तूस त्यांचे नाव देण्यात यावे अशी भारतीय जनता पार्टीची मागणी आहे.



### जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचीत करण्यात येते कि, खालील वर्णनाच्या भुखंडाचे मालक श्रीमती सुलोचना जनार्दन म्हात्रे, रा. उलवे, पो उलवे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या नावे सिडकोकडुन नवी मुंबईच्या विकासासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी १२.५% गा. वि. योजने अंतर्गत अनुकमे १) "भुखंड क्र. ९, क्षेत्र ८०० चौ. मी., से. २३, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड नवी मुंबई व २) "भुखंड क्र. १९, क्षेत्र ८०० चौ. मी., से. २३इ, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड नवी मुंबई" या वर्णनाचे भुखंड वितरीत करण्यात आलेले आहेत. सदरचे भुखंड माझे अशिल 'खरेदी विकी करारानुसार' खरेदी करीत असुन सदरचे भुखंड मे. सिडको लिमीटेड यांच्या कार्यालयात "त्रिपक्षिय कराराद्वारे" कायमस्वरूपी माझ्या अशिलांच्या नावे करण्यात येत आहे.

तरी कोणीही व्यक्ती / व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी कंपनी, बक्षिस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधीत कागदपत्रांसोबत माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर भुखंडाचे त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तकारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४ /०४/२०२६

सही/-
**ॲड. संकल्प नि. पाटील**

कार्यालय : तळमजला, अष्ठविनायक को. ऑप. हौ. सोसायटी,
भुखंड क्र. वि ४०, से. २०, नेरूळ, नवी मुंबई-४०० ७०६.
फोन नं. ९३२२४२६७७६

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - दुंदरे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०/६ | ०-१५-०० | ३.०० | शरद नारायण उसाटकर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०३/०४/२०२६.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१



## हनुमान जन्मोत्सवाला साबाई गडावर ध्वज परंपरा

### खालापूर ग्रामस्थांकडून पूजा-अर्चा

**खोपोली : प्रतिनिधी**

हनुमान जन्मोत्सव दिवशी साबाई गडावर ध्वज लावण्याची परंपरा असून गुरुवारी मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते. खालापूर ग्रामस्थांची ग्रामदेवता असलेल्या साबाई मातेच मंदिर खालापूर शहरात असून खालापूर शहराच्या वेशीवर साबाई गड आहे. या गडाच्या माथ्यावर साबाई मातेचे मूळ स्थान आहे. हनुमान जन्मोत्सव दिवशी नवीन ध्वज गडावर लावण्याची परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आली आहे. खालापूरातील ग्रामस्थ पहाटे मंदिरात पूजा अर्चा करून गडाची अवघड वाट चढून गडाचा माथा गाठतात.माथ्यावर डोंगर कपारीत देवीच स्थान आहे.



## रोह्यात हनुमान जन्मोत्सव सोहळा विविध कार्यक्रमांनी साजरा



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा येथील प्रसिद्ध राम मारुती चौकात असलेल्या पुरातन आता नव्याने बांधकाम केलेले श्री हनुमान मंदिरात जन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात भक्तीभावात साजरा झाला.

या कार्यक्रमाला महिला व बाल विकासमंत्री अदिती तटकरे, रा.जि.प. उपाध्यक्ष मधुकर पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे यांनी दर्शन घेतले. मारुती मंदिर ट्रस्टचे विश्वस्त आंनद कुळकर्णी, मोतीलाल जैन व अरुण करंबे यांनी त्यांचा शाल, श्रीफळ प्रदान करून यथोचित सत्कार केला.

नगराध्यक्ष समीर शेडगे, उपाध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर,सभापती, नगरसेवक तसेच हजारोच्या संख्येने निरनिराळ्या क्षेत्रांतील मान्यवर व श्री. हनुमान भक्त यांनी दर्शनाचा लाभ घेतला. दिवसभर झालेल्या विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये सकाळी ५.१५ वा. श्री. हनुमान मारुती जन्मोत्सव निमित्त ह.भ.प. सुषमा भावे यांचे किर्तन झाले. सायंकाळी ६ वाजता ह. भ. प. मंदार भावे यांचे भक्ती संध्या (भावगीत )उत्कृष्ठ कार्यक्रम झाला. त्यांना साथीदार श्वेता आठवले सायली बापट, आंनद सहस्त्रबुध्ये, सुयोग कोनकर यांनी दिली. रात्री ८ वाजता रणजित देशमुख, अंधारआळी यांचे बहारदार किर्तन झाले.

हनुमान जयंती निमित्ताने मंदिर उत्कृष्ठ रंगी -बेरंगी फुलांच्या माळानी सुशोभीत केले होते. सुबक आकर्षक रांगोळ्या व विधुत रोषणाई केली होती. भतिमय गीतांनी परिसरातील वातावरण उत्साहीत दिसत होते.

## ३४० वर्षांची परंपरा जपणाऱ्या पालीतील मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**

पाली शहरातील मधली आळी, कसबे पेठ येथे वसलेले प्राचीन व ऐतिहासिक श्री मारुती देवस्थान हे केवळ मंदिर नसून पाली करांच्या श्रद्धा, परंपरा आणि भक्तीचे केंद्रस्थान म्हणून ओळखले जाते. तब्बल सुमारे ३४० वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या या मंदिरात यंदाचा श्री हनुमान जन्मोत्सव अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींच्या चरणी नतमस्तक होत भक्तीची अनुभूती घेतली. अध्यक्ष अभिजीत चांदोरकर व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात पुण्याहवाचनाने झाली. त्यानंतर



### अनेक पिढ्यांकडून सेवा

*श्री मारुती देवस्थानाचा इतिहास शके १६०८ (सन १६८६) पर्यंत मागे जातो. म्हणजेच हे मंदिर सुमारे ३४० वर्षांपूर्वीचे असून अनेक पिढ्यांच्या श्रद्धा-विश्वासाचे प्रतीक आहे. मंदिरातील साडेपाच ते सहा फूट उंच, भव्य आणि रेखीव अशी श्री मारुतीची मूर्ती भक्तांना आजही तितक्याच भक्तिभावाने आकर्षित करते. या मूर्तीची स्थापना समर्थ रामदास किंवा त्यांच्या परंपरेतील एखाद्या संतांनी केली असावी, असा उल्लेख आढळतो.*

धनंजयबुवा गद्रे (पाली) यांच्या कीर्तनातून श्रीरामभक्त हनुमंताची महती भाविकांसमोर उलगडली. स्वरसाधना भजनी मंडळ व सिद्धकला भजनी मंडळ यांच्या भजनांनी परिसर भक्तिरसाने भारावून गेला. श्री चैत्रागौरी हळदीकुंकू कार्यक्रमामुळे महिलांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

श्री जन्माचे कीर्तन, श्री हनुमान तांडव व श्रीराम तांडव स्तोत्र पठण या कार्यक्रमांनी वातावरण अधिकच आध्यात्मिक झाले. चिपळूण येथील गायक राजाभाऊ शेंबेकर यांच्या गायनाने भक्तांना मंत्रमुग्ध केले. महानैवेद्य जयंतशेठ ओसवाल यांच्या तर्फे तर महाप्रसाद दीपकशेठ ओसवाल यांच्या सौजन्याने वितरित करण्यात आला. यावेळी हनुमान भक्त सचिन साजेकर यांनी श्रींना चांदीचा मुकुट व समई अर्पण करून आपली श्रद्धा व्यक्त केली, ही बाब विशेष लक्षवेधी ठरली.

शतकानुशतके अनेक जीर्णोद्धार होऊनही मंदिराचा मूळ आध्यात्मिक वारसा कायम राखण्यात आला आहे. शके १८०८ (१८८६) व नंतर १९३६ मधील जीर्णोद्धार हे त्याचे साक्षीदार आहेत.

## पोलीस पाटील अनंत ठोंबरेंना महाराष्ट्र लोकसेवा पुरस्कार



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत रघुनाथ ठोंबरे यांचा महाड येथे स्वराज्य भूमी गौरव संमेलनात महाराष्ट्र लोकसेवा पुरस्कार देऊन सन्माननीत करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आई फाऊंडेशन भारत, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व स्वराज्य भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्वराज्य भूमी गौरव संमेलनात सुप्रसिद्ध अभिनेता संतोष पाटील,उदय भाऊसाहेब वाघेरे, संचालक, ग्रुप ऑफ कंपनी- पिंपरी पुणे, प्रा. डॉ. बी. एन. खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन युवा पुरस्कार विजेते, महाराष्ट्र शासन,डॉ. विनोदराव मोरे संस्थापक अध्यक्ष आई फाउंडेशन, रायगड (भारत) यांच्या हस्ते करण्यात आला. पोलीस पाटील अनंत रघुनाथ ठोंबरे हे खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष असून, बाल विवाह रोखणे, दारू बंदी, व्यसन मुक्ती साठी कार्यरत, अपघातग्रस्त यांना मदत करणे, आणि गरजू विद्यार्थी यांना शैक्षणिक मदत करीत असतात.



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे. कल्ले, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

- मिळकतीचे वर्णन-

**मौजे : कल्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कल्ले | १. शादाब शब्बीर दीवाण<br>२ उझमा साकीब मिटकर<br>३ आबुजर इब्राहीम दळवी<br>४ शाजमीन इब्राहीम दळवी<br>५ शिरीन इब्राहीम दळवी<br>६ समरीन रवीश शेख<br>रा. सर्व, बारापाडा<br>ता. पनवेल, जि. रायगड | १८/२ | ०.६५.००<br>०.०५.००<br>०.७०.००<br>हे.आर.पॉ | १.५६ |
| | | **एकूण** | **०. ७०. ००** | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीत न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०३/०४/२०२६**

सही/-
**ॲड. सरिता महेंन्द्र साखरे**

पत्ता- बंन्सल असोसिअ्स, पहिला मजला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.



## म्हसळा तालुक्यात जमिनीचा पोटहिस्सा मोजणीचा पथदर्शी प्रकल्प; अत्याधुनिक तंत्रज्ञानाने होणार अचूक मोजमाप

**म्हसळा : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेंतर्गत (२०२४-२५) महाराष्ट्र राज्यातील जमिनींच्या पोटहिस्सा मोजणी आणि नकाशे अद्ययावत करण्यासाठी एका महत्त्वाकांक्षी पथदर्शी प्रकल्पाची घोषणा करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्याची या विशेष प्रकल्पासाठी निवड करण्यात आली असून, यामुळे तालुक्यातील शेतजमिनींचे मोजमाप आता अधिक अचूक आणि पारदर्शक होणार आहे.

राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून तीन तालुके याप्रमाणे एकूण १८ तालुक्यांची या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातून म्हसळा तालुक्याचा यात समावेश असून, प्राथमिक टप्प्यात तालुक्यातील पाच गावांपासून या कामाला सुरुवात होणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात म्हसळा तालुक्यातील १.मौजे आगरवाडा, २.खरसई, ३.तोंडसुरे, ४.पाभरे, ५.वरवटणे या पाच गावांमध्ये कार्यवाही केली जाईल. या गावांचे काम पूर्ण झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने संपूर्ण तालुक्यात ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोजणी प्रक्रियेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान. "कोर्स (CORS) आणि जीएनएनएस (GNSS) रोव्हर" या प्रणालीच्या साहाय्याने जमिनीचे मोजमाप केले जाईल, "जी.आय.एस (GIS)" आधारित मोजणी करताना संगणक प्रणालीद्वारे क्षेत्राची अचूक गणना केली जाणार असल्याने मानवी चुकांना वाव राहणार नाही. अचूक मोजमापामुळे शेतकऱ्यांचे ७/१२ अधिकार अभिलेख पूर्णपणे अद्ययावत होण्यास मदत होईल.

याशिवाय या प्रकल्पामुळे जमिनींचे वाटप केवळ पारदर्शकच होणार नाही, तर भविष्यातील जमिनीचे वाद टाळण्यास मोठी मदत होणार आहे. नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार असून जमिनीचे मूल्य वाढण्यासही हातभार लागेल. तसेच जमिनीचे दस्तऐवज व्यवस्थित झाल्यामुळे विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे शेतकऱ्यांसाठी अधिक सुलभ होणार आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्यक्ष मोजणीचे काम लवकरच सुरू होत आहे. म्हसळा तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या जमिनींचे पोटहिस्से करून घ्यावेत, असे अवाहन केले आहे.

# साधना सप्ताहाच्या माध्यमातून शासकीय कर्मचारी होणार 'फ्युचर रेडी'



**नवी मुंबई : बातमीदार**

प्रशासकीय कामात गतीमानता आणण्यासाठी आणि शासकीय कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल यांनी आज कोकण विभागातील सर्व शासकीय यंत्रणांच्या प्रमुखांची आणि पदाधिकाऱ्यांची दूरदृष्यप्रणालीव्दारे आढावा बैठक घेतली. २ एप्रिलपासून सुरू झालेल्या व ०८ एप्रिल पर्यंत चालणाऱ्या कालावधीत चालणाऱ्या या सप्ताहात कोकण विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.

प्रशासनात कार्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करता यावा यासाठी विविध प्रशिक्षणांद्वारे क्षमता विकास करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाने क्षमता विकास आयोग (सीबीसी) आणि-कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने 'साधना सप्ताह' आयोजित केला आहे. महाराष्ट्रातही मंत्रालयीन व राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'साधना सप्ताह' अंतर्गत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. 'साधना' सप्ताहाचा मुख्य उद्देश शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवणे हा आहे. पोर्टलच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना विविध कौशल्य विकास अभ्यासक्रम पूर्ण करायचे आहेत.

प्रत्येक कर्मचाऱ्याने या सात दिवसांच्या कालावधीत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे. यामध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स , डेटा ॲनालिटिक्स, ब्लॉकचेन, आणि प्रभावी संवाद कौशल्य यांसारख्या आधुनिक विषयांवरील कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोकण विभागातील जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण करून 'कौशल्यपूर्ण प्रशासना'त आपले योगदान द्यावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

### उत्कृष्ट कामगिरीचा केला जाणार गौरव

या मोहिमेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विभागांना आणि जिल्हा प्रशासनाला विशेष गौरवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते होणाऱ्या 'टेक वारी २.० या कार्यक्रमात उत्कृष्ट विभागांना सन्मानित केले जाईल, अशी माहितीही यावेळी देण्यात आली. "बदलत्या काळासोबत प्रशासनाने अद्ययावत होणे ही काळाची गरज आहे. साधना सप्ताहाच्या माध्यमातून मिळणारे हे ऑनलाईन प्रशिक्षण कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक प्रगतीसोबतच शासकीय कामाचा दर्जा सुधारण्यास मदत करेल. कोकण विभागाने यामध्ये आघाडी घ्यावी, अशी अपेक्षा कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवालयांनी यावेळी व्यक्त केली. या बैठकीला कोकण विभागातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी आणि इतर संबंधित विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सिलिंडरच्या उपलब्धतेबाबत उरणमध्ये तहसीलदारांना निवेदन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जनतेला गॅस सिलिंडरची टंचाई भासत आहे, याची योग्य ती दखल घेऊन गॅस सिलिंडरची उपलब्धता वाढवून सिलेंडर बुकींग नंतर त्वरीत वितरीत करण्यासाठी सहकार्य करावे अशा स्वरूपाचे निवेदन अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या शिष्टमंडळाच्या वतीने उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांना गुरुवारी २ एप्रिल रोजी देण्यात आले.

इराण - अमेरिका युद्धजन्य परिस्थितीत केंद्र व राज्य सरकार गॅस सिलेंडरचा तुटवडा नसल्याचे प्रसार माध्यमातून सतत जाहीर करीत आहे. मात्र प्रत्यक्ष राज्यात सर्वत्र गॅस सिलेंडरसाठी गावात, शहरात लांबच लांब रांगा दिसत असल्याच्या बातम्या वृत्त पत्रातून प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे जनतेला दिलासा देण्यासाठी पूर्वी प्रमाणे २१ दिवसानंतर किंवा जास्तीत जास्त ३० दिवसात सिलेंडरची बुकिंग घेऊन २ ते ५ दिवसात गॅस भरलेला सिलेंडर उपलब्ध करून द्यावा.



असे निवेदनात म्हटले आहे.

कुटुंबातील आबालवृद्धांना दैनंदिन किमान चहा, नास्ता व जेवण बनवून देणे गृहिणींना शक्य होईल. त्यासोबत केंद्र सरकारने दोन दिवसापूर्वी जाहीर केल्यानुसार रॉकेलचा पुरवठा तातडीने सूरू करावा. अशीही मागणी संघटनेच्या वतीने उपस्थित शिष्टमंडळाने केली आहे.सदरचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न नगरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना ईमेल द्वारे तात्काळ कळवावी व रायगचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनाही फोन द्वारे संपर्क करून कळवावे असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय उरण तालुक्यातील सर्व गॅस पुरवठा एजन्सीचे चालक हे ग्राहकांना सहकार्य करून सिलेंडरची पुरवठा साखळी नियमित सुरु ठेवतील, चढ्या दराने, भ्रष्ट मार्गाने सिलेंडरची विक्री करणार नाहीत, याची काळजी आपण घ्यावी. त्याच प्रमाणे आपण दैनंदिन अहवाल प्राप्त करून जनतेस नियमित गॅस सिलेंडर उपलब्ध होतील याची तजवीज करावी अशा मागणीच्या आशयचे निवेदन उरणचे तहसिलदार डॉ.उद्धव कदम यांना निवासी नायब तहसिलदार यांच्या उपस्थितीत अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या राज्य उपाध्यक्षा हेमलता पाटील यांच्या हस्ते सादर करण्यात आले आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीला चाप

## पनवेल वाहतूक शाखेची रात्री विशेष तपासणी मोहीम



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात वाढत चाललेली अवैध प्रवासी वाहतूक आणि रिक्षाचालकांच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेने गुरुवारी रात्री विशेष तपासणी आणि नाकाबंदी मोहीम राबवली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि पनवेल आरटीओच्या सहकार्याने ही कारवाई रात्री १० ते १२ वा. सुमारास पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व व पश्चिम परिसरात करण्यात आली. या मोहिमेत विनापरवाना रिक्षा चालवणारे, गणवेश नसलेले, फिटनेस आणि विम्याची मुदत संपलेली वाहने, तसेच तीव्र प्रकाशाच्या हेडलाईट्सचा वापर करणाऱ्या रिक्षाचालकांवर पोलिसांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला.

यावेळी एकूण १२० रिक्षांची कसून तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३० रिक्षाचालकांवर विविध नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. यामध्ये एका रिक्षाचालकावर मद्यप्राशन करून वाहन चालवल्याबद्दल कारवाई करण्यात आली असून एक रिक्षा जप्त करण्यात आली आहे. या धडक कारवाईच्या भीतीने स्थानक परिसरातून अनेक रिक्षाचालकांनी पळ काढल्याने प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र पोलिसांनी एनएमटी विभागाशी संपर्क साधला आणि रात्रीच्या वेळी प्रवाशांसाठी अतिरिक्त बसची सोय उपलब्ध करून देण्यात आली.

# जनगणनेसाठी नागरिकांना ऑनलाईन स्वगणनेची सुविधा

**नवी मुंबई :बातमीदार**

भारत सरकारने जनगणना कार्यक्रम २०२७ जाहीर केला असून जनगणना कार्यक्रमाचा अंतिम कालावधी ३१ मार्च २०२७ रोजी ००:०० तास आहे. भारत देशात दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची परंपरा असून पहिली जनगणना १८७२ मध्ये झालेली आहे. २०२७ मधील जनगणना ही १६ वी जनगणना असून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची ८ वी जनगणना आहे आणि २१ व्या शतकातील ३ री जनगणना आहे. ही जनगणना दोन स्वतंत्र टप्प्यात होत असून पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना दि. १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीमध्ये पार पडेल आणि दुसरा टप्पा फेब्रुवारी / मार्च २०२७ मध्ये पार पडेल.

जनगणना २०२७ ही भारतातील डिजीटल पध्दतीने राबविण्यात येणारी पहिली जनगणना असून जनगणना प्रक्रियेच्या आधुनिकीकरणाचे हे एक परिवर्तनशील पाऊल आहे. क्षेत्रीय स्तरावरील प्रगणक व पर्यवेक्षक माहिती संकलनासाठी स्वतःचे मोबाईल उपकरण वापरून माहिती संकलन करणार आहेत व ती माहिती सेंट्रल सर्व्हरवर डिजीटल स्वरूपात नोंद करतील.

जनगणना २०२७ साठी महानगरपालिका आयुक्त हे 'प्रधान जनगणना अधिकारी' असतील तसेच उपायुक्त (परिमंडळ-२) हे 'शहर जनगणना अधिकारी' असतील. सर्व विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त हे 'चार्ज जनगणना अधिकारी' असतील. त्यांना 'अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी' हे जनगणना कामी सहाय्य करतील.

प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्यास प्रारंभ होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर म्हणजेच १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध असेल. स्वगणना हा एक नाविन्यपूर्ण आणि नागरिकांना सुलभ व सोयीस्कर पर्याय आहे. तो आपल्या सोयीनुसार सुरक्षित वेब पोर्टल वापरून नागरिकांना आपल्या कुटुंबाची माहिती स्वतःहून ऑनलाईन भरण्याची मुभा देतो. याकरिता नागरिकांनी ऑनलाईन पोर्टल (sc. census.gov.in) ला भेट द्यावी.

जनगणना पोर्टलमध्ये प्रश्न आणि पर्याय एचएलओ मोबाईल ॲप प्रमाणेच असून वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि टूलटीप्सद्वारे उत्तरदात्यांना मदत केली जाते, उपलब्ध पर्यायांपैकी आपला योग्य पर्याय निवडून एकदा कुटुंबाने त्यांची माहिती यशस्वीरित्या सादर केली की, त्यांना एक विशिष्ट स्वगणना आयडी प्राप्त होईल. हा एसई आयडी दाखवून आपली अचूक व संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. आपली अचूक माहितीच पुढील अनेक वर्षांच्या प्रगतीची दिशा ठरवेल. ही केवळ लोकांची गणना नाही तर हा 'विकसित भारत २०४७' चा पाया आहे.

जनगणना अधिनियम १९४८ नुसार प्रत्येक व्यक्तीची माहिती गोपनीय ठेवली जाते. नावे आणि ओळख उघड केली जात नाही, या माहितीचा वापर कोणत्याही कर आकारणीसाठी किंवा तपासणीच्या उद्देशासाठी केला जात नाही याची नोंद घेऊन सर्व नागरिकांनी जनगणनेमध्ये स्वगणनेचा पर्याय स्विकारावा आणि नोंदणी करावी अथवा आपल्याकडे जनगणना माहिती संकलनासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# वार्षिक मूल्यदर स्थिर राहिल्याने बांधकाम क्षेत्राला मिळणार उभारी

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालयाने सन २०२६-२७ या वर्षासाठी वार्षिक मूल्यदर स्थिर ठेवण्याचा घेतलेला धाडसी व सकारात्मक निर्णय मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाने मनःपूर्वक स्वागत केले आहे. हा निर्णय केवळ बांधकाम व्यावसायिकांसाठीच नव्हे, तर राज्यातील लाखो घरखरेदीदारांसाठी नववर्षाची मोठी भेट ठरली आहे.

१ एप्रिल २०२६ पासून लागू होणाऱ्या नवीन दरांमध्ये कोणतीही वाढ न करता ते जैसे थे ठेवण्यात आले आहेत. दर निश्चित करताना जिल्हा स्तरावर बांधकाम व्यावसायिक, दस्त लेखक तसेच लोकप्रतिनिधींशी चर्चा करून वास्तव परिस्थितीचा सखोल विचार करण्यात आला आहे.

सन २०२५-२६ मध्ये राज्याला ₹६०,५६८.९४ कोटी इतका विक्रमी महसूल प्राप्त झाला आहे. दरवाढ न करताही महसुलात झालेली ही वाढ व्यवहारांमधील गती आणि बाजारातील स्थैर्य स्पष्टपणे दर्शवते.

या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना घरखरेदीसाठी मोठा दिलासा मिळणार असून घरांच्या किमती नियंत्रणात राहण्यास मदत होईल. स्थिर दरांमुळे गुंतवणूकदारांचा बाजारावरील विश्वास वाढेल आणि रिअल इस्टेट क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल. तसेच वाढत्या बांधकाम खर्चामुळे दबावाखाली असलेल्या प्रकल्पांना या निर्णयामुळे मोठा आधार मिळणार आहे.

महासचिव प्रकाश बाविस्कर यांनी सांगितले की, "रेडी रेकनर दर स्थिर ठेवण्याचा निर्णय हा सरकारची दूरदृष्टी आणि विकासाप्रती असलेली निष्ठा दर्शवतो. फडणवीस सरकारने वास्तव परिस्थितीचा अचूक अभ्यास करून हा संतुलित निर्णय घेतला आहे. यामुळे मालमत्ता व्यवहारांना वेग येईल आणि राज्याच्या अर्थचक्राला मोठी गती मिळेल.मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघ आगामी काळातही शासनासोबत समन्वय साधून बांधकाम क्षेत्राच्या प्रगतीसाठी व पारदर्शकतेसाठी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही महासंघातर्फे देण्यात आली आहे.

# तुर्भे विभागातील नगरसेवकांचे आमदार मंदा म्हात्रे यांना निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर विकासाच्या दिशेने झपाट्याने प्रगती करत असताना बेलापूर विधानसभा क्षेत्रात विविध विकासकामांना गती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर तुर्भे विभागातील नगरसेवक व माजी नगरसेवकांनी आमदार मंदाताई म्हात्रे यांना महत्त्वाचे निवेदन सादर केले.

तुर्भे विभागातील नगरसेविका सविता लगाडे (प्रभाग क्र. २०-अ), नगरसेविका अबोली कुलकर्णी (प्रभाग क्र. २०-ब), नगरसेवक सुरेश कुलकर्णी (प्रभाग क्र. २०-क), नगरसेविका सविता सांगळे (प्रभाग क्र. १४-ब) तसेच माजी नगरसेवकांनी संयुक्तपणे हे निवेदन दिले.या निवेदनात वेस्ट-टू-एनर्जी व सीबीजी प्रकल्पामुळे झोपडपट्टीवासीयांच्या अस्तित्वावर आणि त्यांच्या संवैधानिक अधिकारांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

यावर प्रतिक्रिया देताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, बेलापूर विधानसभा क्षेत्रात कोणताही प्रकल्प राबविताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच निर्णय घेतले जातात. संबंधित विषयावर लवकरच नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन तोडगा काढला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच, जनतेच्या सामाजिक हिताचे रक्षण करत कोणत्याही नागरिकावर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# उरणमध्ये हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

**उरण : बातमीदार**

उरण शहरात तसेच उरण तालुक्यातील विविध ग्रामीण भागात श्री हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पागोटे,हनुमान कोळीवाडा, वेश्वि,वशेणी, करंजा आदी गावात तसेच उरण शहरात भाजी मार्केट बाजारपेठ तसेच गणपती चौकात श्री हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला.

उरण शहरातील गणपती चौकात श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ उरण यांच्या वतीने पहाटे ४ वाजता महापूजा, पहाटे ५ वाजता हभप सुधीर विश्वनाथ बाळ यांचे सुश्राव्य असे किर्तन झाले.भाविक भक्तांना कल्पेश ठक्कर यांच्या माध्यमातून उपवासाच्या खिचडीचे वाटप करण्यात आले. सकाळी ८ ते १२ या वेळेत श्री गजानन प्रसादिक भजन मंडळ यांचे भजन झाले. श्री गजानन प्राथमिक भजन मंडळाचे बुवा वसंत मांडेलकर,गणेश सावंत,



शैलेश राऊत, भारत पाटील, जगदीश भोईर,भालचंद्र म्हात्रे, कु. वेदांत,सन्नी मांडेलकर आदींनी उत्तम असे भजन गाऊन रसिक प्रेषक भाविक भक्तांना मंत्र मुग्ध केले.दुपारी १२ ते ३ या वेळेत कै. सुनिता महादेव ढोले, कै. मीना के रूपचंदानी यांच्या स्मरणार्थ महाप्रसाद देण्यात आले.त्यानंतर शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे यांचे भजन झाले. शेवटी पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीला श्री गजानन प्रासादिक भजन मंडळाची साथ संगत लाभली.मंदिरात श्री हनुमान मूर्तीचे दर्शन घेतलेल्या विविध प्रतिष्ठित मान्यवरांचे यावेळी शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.दिवसभर चाललेल्या विविध कार्यक्रमांना भाविक भक्तांचा उत्तम प्रतिसाद लाभला.भाविक भक्तांची दिवसभर गर्दी पहावयास मिळाली. सर्वच भावीक भक्तांनी शांततेत रांगेत उभे राहून शिस्तीने दर्शन घेतले.सर्वच कार्यक्रम उत्तमपणे संपन्न झाले.सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अशोक कडू, उपाध्यक्ष महेश अधिकारी, कार्याध्यक्ष विपुल पारेख, सचिव ॲड.रोहित पाटील, सहसचिव ॲड.रेखा पाटील, खजिनदार धनंजय भागवत, सहखजिनदार मनोज म्हात्रे,सल्लागार विठ्ठल ममताबादे,व्यवस्थापक निर्मला ममताबादे, ह भ प भालचंद्र म्हात्रे, रघुनाथबुवा हातनोलकर यांच्यासह सर्व कार्यकारी पुरुष सभासद, कार्यकारी महिला सभासद - सुविधा म्हात्रे,प्राजक्ता भागवत, मिलिंदा माळी यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# ऐरोलीतील भारतरत्न डॉ. आंबेडकर स्मारकात जागर व्याख्यानमाला

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेने ऐरोली से.१५ येथे उभारलेले भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यतम स्मारक येथील आगळ्या वेगळ्या सुविधांमुळे देशातील अत्त्युत्तम स्मारक असल्याचे अभिप्राय या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देणा-या विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींप्रमाणेच सामान्य नागरिकांकडूनही व्यक्त करण्यात आलेले आहे.

'ज्ञान हीच शक्ती' या बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांचा प्रसार स्मारकातून व्हावा या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने सुरुवातीपासूनच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींच्या व्याख्यानांचे आयोजन करुन या ठिकाणी ज्ञान जागर करण्याचा वसा जोपासला आहे.या अनुषंगाने मागील साडेचार वर्षात या ठिकाणी सातत्याने 'विचारवेध' या शिर्षकांतर्गत साहित्य व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच सोबतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे औचित्य साधून 'जागर' या मान्यवर व सुप्रसिध्द व्यक्तींच्या विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात येत आहे. या सर्व उपक्रमांना श्रोत्यांचा भरभरुन प्रतिसाद लाभत आहे.

'जागर'ची हीच वैचारिक परंपरा कायम राखत या वर्षीही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधत 'जागर २०२६' या व्याख्यान शृंखलेचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व व्याख्यात्या ॲड. वर्षा देशपांडे यांचे 'सामाजिक परिवर्तनातील महिलांची भूमिका' या विषयावर व्याख्यान , लोकप्रिय असणा-या गायिका रसिका व कृतिका बोरकर यांच्याशी 'सुसंवाद' साधला जाणार आहे.सुप्रसिध्द कवी लोकशाहीर संभाजी भगत हे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सांस्कृतिक दृष्टी' या विषयावर व्याख्यान देणार आहेत.ज्येष्ठ संपादक व लेखक श्री. श्रीकांत बोजेवार हे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर : गंभीर आणि दिलखुलास' या विषयावरील व्याख्यानातून बाबासाहेबांच्या आभाळाएवढ्या व्यक्तीमत्वातील विविध पैलू उलगडणार आहेत.सुप्रसिध्द अभिनेते आणि लोकप्रिय कवी श्री.किशोर कदम तथा सौमित्र प्रेक्षकांशी 'दिलखुलास संवाद' साधणार आहेत.

# लेखनिक अशोक पाटील यांना सेवानिरोप

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या पी.डी. खारपाटील माध्यमिक शाळा व राजेंद्र खारपाटील उच्च माध्यमिक शाळेचे वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील हे ३३ वर्ष सेवा बजावत, नियत वयोमानानुसार सेवेतून ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील यांनी सुरुवातीच्या काळात अलिबागच्या कोकण एज्युकेशन सोसायटीत २४ वर्ष सेवा बजावली. तर पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीत २०१६ मध्ये रुजू होऊन, त्यांनी नऊ वर्ष, नऊ महिने उत्तम सेवा बजावून त्यांनी शाळेशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले आहेत. सत्कारमूर्ती अशोक पाटील यांचा सेवापुर्तीचा सत्कार समारंभ २५ मार्च रोजी चिरनेर शाळेत



आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सत्कारमूर्ती अशोक पाटील व सहचारणी सपना पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, साडी चोळी व भेटवस्तू देऊन अध्यक्ष पांडुरंग खारपाटील यांच्या कुटुंबीयांतर्फे आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासन अधिकारी व्ही ए पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादुर, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर, माजी सभापती वैशाली पाटील, प्रदीप रसाळ, डी पी पाटील, जिचंद भगत, डॉ. प्रज्योत पाटील, सुरेंद्र कठोर, नवगाव मच्छीमार सोसायटीचे माजी चेअरमन, कोएसो नवगाव शाळेची विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, मुले जावई यांच्यासह नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते.

# सागरी महामार्ग कोकण विकासाचा गेमचेंजर!

## ● १० हजार कोटींचा प्रकल्प, ४९८ किमी किनारी महामार्ग
## ● सात भव्य पूल, अनेक पर्यटनस्थळांना मिळणार चालना

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणाच्या किनारपट्टीवर विकासाची नवी क्रांती घडवणारा रेवस–रेड्डी सागरी किनारा महामार्ग हा प्रकल्प आता वास्तवात उतरत आहे. तब्बल चार दशकांनंतर राज्य सरकारने प्रशासकीय मंजुरी दिली. आता प्रत्यक्ष कामांना गती लाभली असून कोकणवासीयांमध्ये आनंद आणि अपेक्षेचा संगम साकारला आहे.

हा महामार्ग केवळ वाहतूक सुलभ करणारा नाही, तर कोकणाच्या आर्थिक, पर्यटन आणि सामाजिक उत्थानाचा आधारस्तंभ ठरेल. मार्गाचे वैशिष्ट्य आणि तांत्रिक वैभव रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतून वाहणारा हा ४९८ किलो मीटर लांबीचा सागरी महामार्ग मुंबई–गोवा महामार्गाला एक मजबूत पर्याय ठरेल. सध्या कोकणातील प्रवासातील अंतर ८० किलोमीटरने कमी होईल आणि दीड तास वेळ वाचेल, ज्यामुळे व्यापार, पर्यटन आणि दैनंदिन वाहतुकीला प्रचंड फायदा होईल. एकूण १० हजार कोटी रुपयांचा हा मेगा प्रकल्प काही ठिकाणी चौपदरी आणि काही ठिकाणी दुपदरी रस्त्यांसह बांधला जात आहे.

या मार्गातील सर्वात आकर्षक वैशिष्ट्य म्हणजे समुद्र आणि खाड्यांवर उभारले जाणारे सात भव्य पूलः रेवस–करंजा, रेवदंडा, बाणकोट, अगरदांडा, केळशी, कुणकेश्वर आणि जयगड. हे पूल आधुनिक अभियांत्रिकीचे नमुने ठरतील, जे वादळी समुद्राच्या आव्हानांना तोंड देऊन कोकणाच्या किनारी अडथळे दूर करतील. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) या पुलांची कामे वेगाने पुढे नेत आहे, तर अलिबाग ते मुरुडपर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरणही प्रगतिपथावर आहे.

गावांच्या बाह्य वळणाने जाणारा हा मार्ग पुनर्वसनाच्या जटिलतेपासून मुक्त असल्याने स्थानिक शेतकरी आणि रहिवाशांसाठी हा मोठा दिलासा आहे. अलीकडेच मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेत या प्रकल्पाला अंतिम धक्का देण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते धरमतर– रेवस–करंजा पुलाचा शुभारंभ झाल्याने कामांना अधिक गती मिळाली. २०३०पर्यंत हा संपूर्ण महामार्ग वाहतुकीसाठी खुला होईल, अशी अपेक्षा आहे. केंद्र आणि राज्य सरकारांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय मानकांसह बांधला जात असून त्यात पर्यावरणीय संतुलन राखण्यावर विशेष भर आहे तसेच हे फुल बांधताना पूलाचे डिझाइन मध्ये बांधून यात मासे आणि पक्ष्यांच्या प्रवासाला अडथळा येऊ नये याची काळजी घेण्यात येणार आहे.

### अटल सेतू ते रेवस : सागरी महामार्गाचे भव्य प्रवेशद्वार!

*मुंबईपासून करंजामार्गे अलिबागजवळील रेवस यंत सुमारे १० किलोमीटर लांबीचा भव्य पूल उभारला जात असून हाच रेवस–रेड्डी सागरी महामार्गाचा प्रवेशबिंदू ठरणार आहे. हा पूल केवळ जोडणारा मार्ग नसून मुंबई ते कोकण दरम्यानचा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ करणारा महत्त्वाचा दुवा ठरेल. अटल सेतू सारख्या आधुनिक प्रकल्पाशी थेट जोडणी मिळाल्यामुळे या सागरी महामार्गाचे रणनीतिक आणि आर्थिक महत्त्व प्रचंड वाढले आहे. यामुळे भविष्यात मुंबई–कोकण प्रवासाला नवे आयाम मिळतील आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यटन, व्यापार व गुंतवणुकीसाठी कोकण अधिक आकर्षक पर्यटन उद्योग निर्मितीच केंद्र म्हणून उदयास येईल.*

# जुने माणगाव चौकात गतिरोधकांची तातडीची गरज

## अपघातांच्या मालिकेमुळे उपाययोजनेची नागरिकांतून मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील वाहतूक कोंडी आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जुने माणगाव येथील तीनबत्ती चौक पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरत आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे या चौकात दररोज जीव धोक्यात घालून नागरिकांना रस्ता ओलांडावा लागत आहे. काही जण गंभीर जखमी होत आहेत, तर काहींना आपला जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी तत्काळ गतिरोधक बसवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

मुंबई–गोवा महामार्गावरील या चौकाची रचना अत्यंत धोकादायक ठरली आहे. काळ नदीच्या पुलानंतर असलेला तीव्र उतार आणि गोव्याच्या दिशेने येताना कोणत्याही प्रकारचे वेग नियंत्रण साधन नसल्याने वाहनांचा वेग अनियंत्रित होतो. परिणामी, क्षणात अपघात घडतात आणि निरपराध नागरिकांना त्याची किंमत जीव गमावून चुकवावी लागते. अनेकदा झालेल्या अपघातांनंतरही संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. गतवर्षी स्थानिक रहिवासी रफिक जामदार या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर नागरिकांचा संताप अनावर झाला होता. त्यांनी महामार्ग रोखून आंदोलन करत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी अधिकाऱ्यांनी गतिरोधक बसवण्याचे आश्वासन दिले होते, मात्र आजपर्यंत त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. परिणामी, अपघातांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे. या परिसरातून दररोज हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवास करतात. जिल्हा न्यायालय, द. ग. तटकरे महाविद्यालय, अशोक दादा साबळे विधी महाविद्यालय, गीता तटकरे नर्सिंग कॉलेज तसेच विविध माध्यमांच्या शाळा याच भागात असल्यामुळे सुमारे पाच हजार विद्यार्थी या मार्गावरून ये–जा करतात. या लहानग्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. महामार्ग अरुंद असल्यामुळे आणि वाहतुकीचा प्रचंड ताण असल्यामुळे या चौकात सतत कोंडी होत असते. काही वेळा तर वाहनांच्या रांगा किलोमीटरपर्यंत वाढतात. अशा परिस्थितीत एखादा अपघात झाला तर परिस्थिती आणखी भीषण बनते. ज्येष्ठ वकील व विधी महाविद्यालयाचे चेअरमन अ‍ॅड. विनोद घायाळ यांनीही या ठिकाणी गतिरोधक बसवण्याची गरज अधोरेखित केली आहे.

# कर्जत तालुक्यात हनुमान जयंती उत्साहात साजरी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील बहुतांश गावात श्री हनुमान जयंती विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यंदा श्री हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

काही गावांत श्री राम नवमी पासूनच सप्ताहभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून श्री हनुमान जयंती साजरी करण्यात आली. मारुतीरायाचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासुनच भाविकांनी रांगा लावल्या होत्या.

कर्जतच्या पाटील आळीतील श्री हनुमान मंदिरात आदल्या रात्री श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळाच्या प्रसादबुवा पाटील यांनी भजन सेवा सादर केली. त्यांना कौशिक वांजळे यांनी मृदंगावर साथ संगत दिली. पहाटे मराठा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सुचिता वांजळे यांनी भजन सेवा सादर केली. पहाटे ६ वाजून ३० मिनिटांनी श्री हनुमान जन्म करण्यात आला. दुपारी भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. सायंकाळी श्री स्वामी समर्थ सेवा, आध्यत्मिक विकास व बालसंस्कार केंद्र कर्जत आयोजित हनुमंत स्तोत्र, श्री स्वामी चरित्र सारामृत ग्रंथाच्या २१ व्या अध्ययाचे पारायण करण्यात आले. त्यानंतर भैरवनाथ प्रासादिक भजन मंडळ किरवली यांच्या भरतबुवा बडेकर यांनी अभंग व गीते सादर केली.



**माणगाव : हनुमान जयंतीनिमित्त पालखी सोहळ्यात राजिप पीएमश्री शाळा उतेखोलवाडी शाळेचे विद्यार्थी, उतेखोल केंद्रप्रमुख शंकर शिंदे, शाळेचे शिक्षक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. या जयंतीनिमित्ताने शिक्षकांनी सांस्कृतिक वारसा जोपसण्याचा प्रयत्न केला.**

# चौल तुलाडदेवीत धावीर उत्सवाला अलोट गर्दी

### श्रद्धा आणि भक्तीची परंपरा; भाविकांची उपस्थिती



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चैत्र पौर्णिमेच्या सायकांळी, चौल तुलाडदेवी येथील श्री धावीर उत्सव मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. या उत्सवाचे निमित्ताने यंदा लाट विधी श्रध्देने व भाविकतेने साजरा करण्यात आला.

चौल तुलाडदेवी नजीकच्या डोंगरात पायथ्याशी श्री धावीर मंदिर आहे. या मंदिरात चैत्र पौर्णिमेच्या शेवटच्या दिवशी सायकांळी उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवात मोठया संख्येने पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती असते. चौल तुलाडदेवी नजीकचे हे मंदिर प्राचीन असल्याचे सांगितले जाते, शिवाय श्री धावीर मंदिराचे उत्सवाचे दिवशी परंपरागत धार्मिक विधी पार पडतो, या विधीला लाट विधी म्हटले जाते. या मंदिरातील उत्सवाला लाट यात्रा सुध्दा संबोधले जाते. यावेळी मोठया संख्येने भाविक श्री धावीराचा दर्शनाचा लाभ घेवून लाट विधीत सहभागी होतो.

या श्री धावीराचे उत्सवाला मंदिरात अनेकाचे अंगात देव संचारतो, अंगात संचारलेला देवाने वैताच्या छड्डीने अंगावर मारून घेत असतो. यावेळी उपस्थित भक्तमंडळी अंगात संचारलेल्या देवाकडे नतमस्तक होतात. मंदिराचे बाजूलाच बगात पंरपरागत उभी आहे, या बगातीचा मानाची काठी चौलची भगत आळी तसेच वरंडेपाडा यांचेकडे असतो. बगातीची उंची १५ फुट असून शके १८४१ पासून बगात तेथे उभी आहे. या बगातीला बोकड अथवा कोंबडाचा मान म्हणून या बगातीला बोकड व कोंबडा बांधून भक्तगण बगातीला बसलेल्या देवाना पाच वेळा गोल गोल फिरवितात. यावेळी धावीर देव,महामरी, तसेच चौल पंचक्रोशीतील २३ देवाधिकांना हा मान बगातीच्या माध्यमातून पोहचविला जातो.

प्रतिवर्षी चैत्र पौर्णिमेचा शेवटच्या सायकांळी श्री धावीर उत्सवासह ही लाटेची यात्रा भरते. चौल पंचक्रोशीतील भाविक मोठया श्रध्दा व भक्तीने या श्री धावीर उत्सवास व लाट यात्रेस येत असतात. रात्रीचे समयी बोकड व कोंबडा यांचा मान देवाला देवून त्याचे प्रसादास येथील पंचपाखाडीचे सभासद घेतात.

# पशुखाद्य दुकानाचे उद्‌घाटन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील शिघ्रे–तेलवडे मुख्य रस्त्यालगत शेतकरी वर्गाची गरज लक्षात घेऊन सौरभ सुनील पाडगे यांनी शेतकरी वर्गाला सुलभ दरात पशु खाद्य मिळावे यासाठी पशुखाद्य दुकान उघडण्यात आले आहे. या पशुखाद्य दुकानाचे उद्‌घाटन ज्येष्ठ समाजसेवक व सामाजिक कार्यात नेहमी सहभागी होणारे ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण मिणमीने यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.



उद्‌घाटन कार्यक्रमासाठी शिवसेना शिंदे गटाचे मुरुड तालुका बांधकाम विभाग अध्यक्ष दिनेश मिणमीने, खालापूर तालुक्यातील सावरोली ग्रामपंचायतीचे सरपंच नागेश मेहेतर, राजपुरी जिल्हा परिषद मतदारसंघाच्या संपर्क प्रमुख जीविता मिणमीने, अहमद दायजी, अजीम कबले, रिजवान कारभारी, मनोज मिणमीने, विनायक पाडगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ समाजसेवक लक्ष्मण मिणमीने यांनी शेतकरीवर्गाची गरज ओळखून दुकान टाकल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आभार व्यक्त केले. शेतकरीवर्गाची मुख्य संपत्ती ही त्याची पाळीव जनावरे आहेत. जनावरांना स्वल्प दरात खाद्य उपलब्ध करून द्यावे, अशी विनंती यावेळी त्यांनी केली.

यावेळी सौरभ पाडगे यांनी जास्तीत जास्त पशुखाद्य घेऊन मला सहकार्य करा, असे आवाहन केले.

## ‘हनुमंत सामर्थ्य, भक्ती आणि आदर्श जीवनाचे प्रतीक’

**चौक : प्रतिनिधी**

निसर्गरम्य आंबेवाडी या आदिवासीवाडीत हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. उद्योगपती नितीन देशमुख यांच्याकडून महाप्रसाद देण्यात आला.

भारतीय संस्कृती आणि धर्मात भगवान हनुमानाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांना सामर्थ्य, भक्ती, धैर्य आणि निःस्वार्थ सेवेचे प्रतीक मानले जाते. हनुमान केवळ एक देवता नसून सामर्थ्य, भक्ती आणि आदर्श जीवनाचे प्रतीक आहेत. त्यांची भक्ती, शक्ती आणि नम्रता आपल्याला जीवन जगण्याची योग्य दिशा दाखवतात. त्यामुळे हनुमानाला कलियुगाचा देव म्हणूनही ओळखले जाते, असे प्रतिपादन उद्योगपती नितीन देशमुख यांनी यावेळी केले.

आंबेवाडी ही थंड हवेचे ठिकाण माथेरानच्या पायथ्याशी असून अतिशय दुर्गम भागात असूनदेखील आदिवासी बांधवांनी अतिशय उत्साहाने विविध धार्मिक उपक्रम राबवत हनुमान जयंती साजरी केली. माजी सभापती कमल राम भस्मा यांनी आयोजित केलेल्या या उत्साहाला उद्योगपती देशमुख यांच्यासह माजी सरपंच प्रफुल्ल विचारे, वैशाली विष्णू खैर यांच्यासह अनेक मान्यवर यांनी आदिवासी भागात येऊन हनुमान देवाचे दर्शन घेतले. यावेळी उपस्थितांचा आदिवासी बांधवांनी सत्कार केला.

रात्री महाप्रसाद झाल्यावर पालखी मिरवणूक काढण्यात आली. या दुर्गम भागातील आदिवासीवाडी येथील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागोठण्यात हनुमान जन्मोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहर व परिसरात गुरुवारी (दि. २) हनुमान जन्मोत्सव सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सायंकाळी पालखी काढण्यात आली.

पालखीचे ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. सुवासिनींनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून अंगणात सुंदर रांगोळ्या काढत आरती करून पालखीचे स्वागत केले, त्यामुळे वातावरण अधिक भक्तिमय झाले.

सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सरखेल कान्होजी आंग्रे ग्रामस्थ मंडळाचे कार्याध्यक्ष चेतन कमथे, अध्यक्ष अभिजीत मालुसरे, उपाध्यक्ष पवन ठमके, खजिनदार वैभव जाधव, सेक्रेटरी ओम कदम, साहिल शिंदे, आदित्य पिंगळे, अशोक गोरे, संजय पिंपळे, ओमकार पिंपळे, कल्पेश चांदविणकर, संकेत पवार, अजय सावंत, रोहन घोगले, आदेश गोरे, प्रवीण बडे, सार्थक खैरे यांच्यासह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



# संत बाळूमामांचा उत्सव भक्तिभावाने

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत बाळूमामा यांचा उत्सव पांगोळी (धनगरवस्ती) येथे मोठ्या उत्साहात पार पडला. हा उत्सव सोहळा दोन चालला आणि यावेळी महाराष्ट्रातून असंख्य भाविक भक्तांनी उपस्थित राहून आशीर्वाद घेतला.

पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे श्री संत बाळूमामा यांचे भव्य मंदिर गेल्या अनेक वर्षांपासून आहे. येथे दरवर्षी हनुमान जयंतीला बाळूमामांचा उत्सव पार पडतो, यावर्षीही उत्सव झाला.



यावेळी पहिल्या दिवशी सायंकाळी महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रम पार पडला. यात भाग घेणाऱ्या आणि क्रमांक पटकावणाऱ्या महिलांना आकर्षक भेटवस्तू आणि बक्षिसे देण्यात आली.रात्री हभप गणेशमहाराज पाटोळे यांचा भारूडाचा कार्यक्रम झाला. सकाळी मंदिरात श्रींचा अभिषेक, होमहवन, सत्यनारायण महापूजा, दुपारी भजन रंगले, तर सायंकाळी ढोल ताशाच्या गजरात, डीजेच्या तालावर श्रींची भव्य मिरवणूक मंदिरापर्यंत काढण्यात आली. रात्री मंदिरात गुरुमाऊली कृष्णान्तमहाराज ढोणे यांची भाकणूक पार पडली. यानंतर मंदिरात सामूहिक महाआरती घेण्यात आली आणि महाप्रसादाने या उत्सवाची सांगता करण्यात आली. येणाऱ्या सर्व भाविक भक्तांची यथोचित सोय श्रीसंत बाळू मामा देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांनी केली.

यावेळी श्रीसंत बाळू देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा प्रमुख विश्वस्त बबन खरात, उपाध्यक्ष बाळू हिरवे,सेक्रेटरी महादू जानकर, खजिनदार निकिता खरात, सहखजिनदार दामा होले, सोनाली मरगळे, मीना शिंद, छावा संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब आखाडे, बाळूमामा उत्सव कमिटी अध्यक्ष रमेश खरात, मारुती जानकर, अनिल मरगळे, तुकाराम हिरवे, बबन हिरवे, अनंता शेडगे, रामदास मरगळे, मारुती खरात, लक्ष्मण मरगळे, सचिन ठीकडे, प्रकाश हिरवे, दिनेश खरात, रोहित खरात, गणेश मरगळे, लहू ठीकडे, पुजारी बाळू मरगळे, रघुनाथ मरगळे, गंगाराम मरगळे, गंगाराम हिरवे, राजू हिरवे, संतोष खरात, संतोष हिरवे, बबन हिरवे, संतोष आखाडे, पांडुरंग जानकर, शंकर जानकर, धोंडिबा मरगळे, खंडू आखाडे, रामभाऊ हिरवे, धोंडिबा हिरवे, नाना खरात, निलेश ठीकडे, सचिन ठिकडे, लहू मरगळे, रमेश खरात, दत्ता कोकरे, कोंडीबा जानकर, आकाश जानकर, शाम मरगळे, आकाश मरगळे, दीपक जानकर, लक्ष्मण मरगळे आदींसह भाविक उपस्थित होते.

# हैदराबादकडून कोलकाताचा धुव्वा



**कोलकाता : वृत्तसंस्था**

फलंदाजांच्या टोलेबाजीनंतर गोलंदाजांनी केलेल्या टिच्चून माऱ्याच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादने आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सचा ६५ धावांनी पराभव केला. केकेआरच्या बालेकिल्ल्यात हैदराबादने विजयी झेंडा फडकावला.

हैदराबादने या लढतीत निर्धारित षटकांत ८ बाद २२६ धावांचा डोंगर उभा केला. आव्हानाचा पाठलाग करताना कोलकाताचा डाव १६१ धावांतच आटोपला. प्रारंभी ट्रॅव्हिस हेड व अभिषेक शर्मा यांचा अवघ्या ५.४ षटकांत ८२ धावांचा फ्लाईंग स्टार्ट आणि हेन्रिच क्लासेनच्या शानदार अर्धशतकाच्या बळावर हैदराबादने निर्धारित २० षटकांत ८ बाद २२६ धावांचा डोंगर रचला. हेडने २१ चेंडूंत सहा चौकार व तीन षटकारांसह ४६, तर अभिषेकने २१ चेंडूंत चार चौकार व चार षटकारांसह ४८ धावांचे योगदान दिले. याशिवाय क्लासेनने ३५ चेंडूंत ५२ धावांची सर्वोच्च खेळी रचली. यात चार चौकार व एका षटकाराचा समावेश होता. नितीशकुमार रेड्डीने २४ चेंडूंत ३९ धावा केल्या.

या धावांचा पाठलाग करताना फिन ॲलन याने पहिल्याच षटकात २४ धावा करत केकेआरला आक्रमक सुरुवात करून दिली, पण तो दुसऱ्याच षटकात बाद झाला. अंगक्रिश रघुवंशीने सलग दुसरे अर्धशतक झळकावले, मात्र तो २९ चेंडूत ५२ धावांवर धावबाद झाला. उपकर्णधार रिंकू सिंह ३५ धावांवर माघारी फिरला अन् कोलकाताचा संघ फसला. हैदराबादकडून जयदेव उनाडकट याने सर्वाधिक तीन, तर इशान मलिंगा आणि नितीशकुमार रेड्डी यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

# अंगस्त इलेव्हन संघ भगवा चषकाचा मानकरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्री राम स्पोर्ट्स न्हावे-सोनखार (ता. रोहा) संघ तसेच चणेरा शिवसेना विभाग प्रमुख गैनिनाथ कटोर यांच्या वतीने मर्यादित षटकांची टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रथम क्रमांक अंगस्त इलेव्हन वैतागवाडी संघाने पटकाविला.



स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना रोहा उपतालुकाप्रमुख उद्देश वाडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रंगतदार सामने झाले. यामध्ये व्दितीय क्रमांक सागर सम्राट न्हावे, तृतीय साई दत्त न्हावे या संघाने प्राप्त केले. स्पर्धेत मालिकावीर आकाश भायतांडेल, उत्कृष्ट फलदांज राजन पाटील, उत्कृष्ट गोलदांज मुस्तकिन मुकादम, अंतिम सामन्यातील सामनावीर हुसेन टाकी यांची निवड करण्यात आली.

बक्षीस वितरण समारंभास जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी, उर्वशी वाडकर, शिवसेना उपतालुकाप्रमुख उद्देश वाडकर, विभागप्रमुख विकास पाटील, ज्येष्ठ शिवसैनिक आप्पा मयेकर, युवासेना प्रमुख सुदर्शन गावडे, कोकबन उपसरपंच तुषार वाजंत्री, सुरज पवार, शाखाप्रमुख प्रसन्न घाग (चणेरा), गणेश दळवी (आरे बुद्रुक), सनी म्हात्रे (धोंडखार), अस्मिता मांदाडकर (महादेव खार), निलेश सुभेदार (कोकबन), न्हावे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक दीपक वारंगे, महिला संघटनेच्या अस्मिता मांडवकर आदी उपस्थित होते.

स्पर्धेत पंचाचे काम नितेश नरहरी, कल्पेश म्हात्रे व रोशन भोईर यांनी, तर समालोचन प्रदीप भोईर व उपेश भायतांडेल यांनी केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी गैनिनाथ कटोर, करण कटोर, जीवन दिवकर, भास्कर कासकर, विदेश सर्लेकर, संग्राम कासकर, साहिल कासकर, रामनाथ कोटकर तसेच श्री राम स्पोर्ट्स सोनखार-न्हावे संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सुधागड तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा रंगली

## भार्जे संघाने श्री बापूजी चषक जिंकला




**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने स्वयंभू हनुमान रहिवासी मंडळ पुणे (चिवे सुधागड) यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुकास्तरीय भव्य श्री बापूजी चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन पुण्यातील नेहरू स्टेडियम येथे करण्यात आले होते. प्रथमच आयोजित केलेल्या या स्पर्धेत १६ संघांनी भाग घेतला होता.

यावेळी कबड्डीपटूंनी आपल्या क्रीडा नैपुण्याचे प्रदर्शन करत उपस्थित क्रीडाप्रेमींना खिळवून ठेवले होते. अंतिम सामन्यात श्री काळभैरव संघ भार्जे यांनी सोमजाई माता संघ गोमाशी यांच्यावर मात करून प्रथम क्रमांक पटकावला. उल्हास क्रीडा मंडळ अंबोले तृतीय, तर ओम काळभैरव आपटवणे संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. सर्वोत्कृष्ट खेळाडू शुभम शिंदे, उत्कष्ट चढाई सुरज मगर, उत्कृष्ट पकड ऋतिक सावंत, पब्लिक हिरो रोशन बैकर, सर्वोत्कृष्ट प्रेक्षक सुशील राठोड यांची निवड करण्यात आली. सर्वांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# बीसीसीआयची अभिषेकवर कारवाई



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुरुवारी ईडन गार्डनवर झालेल्या लढतीत सनरायझर्स हैदराबादने कोलकाता नाईटरायडर्सवर दणदणीत विजय मिळवला. या लढतीत सलामीवर ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांनी केलेली तुफानी फलंदाजी हे हैदराबादच्या विजयाचे खास वैशिष्ट्य ठरले, मात्र फलंदाजीत कमाल दाखवणाऱ्या अभिषेकला बोलंदाजी नडली.

बीसीसीआयने आयपीएल नियमावलीच्या उल्लंघनप्रकरणी अभिषेकवर कठोर कारवाई केली आहे. अभिषेकने आयपीएल कोड ऑफ कंडक्टच्या कलम २.३चे उल्लंघन केले आहे. हा नियम अपमानास्पद किंवा अश्लील भाषेच्या वापराशी संबंधित आहे. बीसीसीआयने अभिषेक शर्मावर कारवाई करताना त्याला सामन्यातील एकूण मानधनाच्या २५ टक्के रकमेचा दंड ठोठावला तसेच त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉईंटही जोडला आहे. अभिषेकनेही झालेली चूक मान्य केली आहे.

# राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेत पनवेलच्या सुखदीप सिंग उभीला कांस्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनच्या वतीने पुणे येथे आयोजित राष्ट्रीय शरीरसौष्ठव अजिंक्यपद २०२६ या प्रतिष्ठित स्पर्धेत पनवेलचा शरीरसौष्ठवपटू सुखदीप सिंग उभी याने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदक पटकावले आहे.

पुरुष गटातील क्लासिक फिजिक्स (१८० सेमीपेक्षा जास्त उंची) गटात देशभरातील नामांकित आणि अनुभवी खेळाडूंमध्ये अत्यंत चुरशीची स्पर्धा झाली. आकर्षक व संतुलित शरीरयष्टी, उत्कृष्ट मसल डेफिनिशन तसेच आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाच्या जोरावर सुखदीप सिंग उभी याने परीक्षकांची मने जिंकत तिसरे स्थान मिळवले. त्याच्या या यशामुळे पनवेल शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. मागील महिन्यात पनवेलमध्ये झालेल्या महाराष्ट्र श्री (आमदार चषक) २०२६ स्पर्धेत ९० किलो गटात सुखदीपने प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत अव्वल स्थान पटकावून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले होते.

सुखदीपच्या या यशामागे कठोर व सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध आहारपद्धती आणि प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. तो खांदा कॉलनी येथील टायसो फिटनेस जिममध्ये नियमित सराव करत असून त्याला प्रशिक्षक निलेश दगडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे पदक त्याच्या मेहनतीचे फलित असून त्यांच्या या यशामुळे पनवेल परिसरात तसेच क्रीडावर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह विविध मान्यवरांनी सुखदीपचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरही हा खेळाडू देशाचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना सुखदीपने म्हटले की, हे यश माझ्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे, कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे आणि सातत्यपूर्ण मेहनतीमुळे शक्य झाले. भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याचा माझा मानस आहे.

# कर्जतमध्ये क्रिकेट स्पर्धा; मंत्री तटकरेंकडून शुभेच्छा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष हर्षल मोरे यांच्या पुढाकारातून सरपंच रितू हर्षल मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त युवक अध्यक्ष चषक भव्य नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.



यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती नारायण डामसे, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अशोक भोपतराव, प्रदेश सदस्य भगवान भोईर, तालुकाप्रमुख दीपक श्रीखंडे, महिलाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, युवक अध्यक्ष अड. स्वप्नील पालकर, जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे, सुवर्णा ठाकरे, सभापती नमिता घारे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपसभापती चित्रा ठाकरे, अक्षय तिटकरे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेविका अंजली कडू, नेहा शिंदे, मानसी कानिटकर, हर्षला गायकवाड, सुमिता गायकवाड, राजाभाऊ कोठारी, कुमेश मोरे, शहराध्यक्ष मधुरा चंदन आदी उपस्थित होते. हर्षल मोरे आणि रितू ठोंबरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

स्पर्धेनिमित्त लकी ड्रॉ काढण्यात आला. महिलांसाठी पैठणीचे पारितोषिक पल्लवी कोकजे यांनी जिंकले, दुचाकीचे बक्षीस संदेश शिर्के यांना मिळाले, तर एलईडी टीव्ही मयुर उतेकर या लहानग्याने पटकावला. मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

# मयूर बांगाराची राष्ट्रीय फिल्ड आर्चरी स्पर्धेसाठी निवड



**माणगाव : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने लातूर येथे आयोजित फिल्ड आर्चरी (कंपाउंड राउंड) राज्यस्तरीय स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये माणगावच्या अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी मयूर बांगारा याने उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने वैयक्तिक गटात चार सुवर्ण आणि सांघिक गटात एक रौप्य अशी एकूण पाच पदकांची कमाई केली.

या देदीप्यमान यशाच्या बळावर मयूरची राष्ट्रीय स्तरावरील फिल्ड आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मयूरला क्रीडा शिक्षक डॉ. रावळे, वाढवळ तसेच प्रशिक्षक बाळू ढेबे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सचिव कृष्णा गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, सदस्य माजी आमदार अनिकेत तटकरे, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ॲड. विनोद घायाळ तसेच नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांनी मयूरचे अभिनंदन केले. याचबरोबर शाळेचे मुख्याध्यापक व प्राचार्य आर.एच. पाटील, उपमुख्याध्यापक दिलीप उभारे, उपप्राचार्य बिरादार, पर्यवेक्षक मिलिंद सोनावणे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही मयूरचे कौतुक केले व राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# वॉर्नर-अलीमध्ये तू-तू मैं-मैं!

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तान सुपर लीगमध्ये एका सामन्यात कराची किंग्सचा कर्णधार डेव्हिड वॉर्नर आणि त्याचाच सहकारी खेळाडू मोईन अली यांच्यात मैदानावर बाचाबाची झाली, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.


रावलपिंडीज संघाला पराभूत करून कराची किंग्सने आपली विजयाची हॅट्ट्रिक नोंदवली, मात्र विजयानंतर खेळाडू मैदानातून बाहेर जात असताना वॉर्नर आणि मोईन अली यांच्यात तीव्र बाचाबाची झाली. त्यावेळी वॉर्नर प्रचंड संतापलेला दिसत आहे, तर अलीदेखील त्याला काहीतरी बोलताना दिसत आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी संघातील इतर सदस्यांनी मध्यस्थी करत दोघांना एकमेकांपासून दूर केले.









वर्ष २१ वे




ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।



विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.





## अखंड हरिनाम सप्ताह

### ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा

व्यासपीठ चालक – ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी–देवाची)

प्रारंभ: चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता: चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

**सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.**

### दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**शनिवार, दि. ०४/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी
किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**

सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

**काल्याचे कीर्तन:** मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com